# उपविधान समिती

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# दुसरा अहवाल

## (२०१२)

सत्यमेव जयते

**(दिनांक २० एप्रिल, २०१२ रोजी विधानसभा/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**


महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

२०१२

# उपविधान समिती

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# दुसरा अहवाल

## (२०११-२०१२)

# उपविधान समिती

## (सन २०१०-२०११ व २०११-२०१२)

(१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
*(२) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(३) श्री.जगन्नाथ शेट्टी, वि.स.स.
(४) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
(५) श्री.वामनराव कासावार, वि.स.स.
(६) श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स.
(७) श्री.संजय वाघचौरे, वि.स.स.
(८) श्री.मानसिंग नाईक, वि.स.स.
(९) श्री.सुधाकर देशमुख, वि.स.स.
(१०) श्री.अशोक शिंदे, वि.स.स.
(११) प्रा.शरद पाटील, वि.स.स.
(१२) ॲड.उत्तमराव ढिकले, वि.स.स.
(१३) श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स.
(१४) श्री.शरद गावित, वि.स.स.
(१५) श्री.उल्हास पवार, वि.प.स.
** (१६) रिक्त
(१७) श्री.संजय पाटील, वि.प.स.
(१८) श्री.अरुणकाका जगताप, वि.प.स.
***(१९) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. म.मु.काज, उप सचिव
(३) श्री. जि.म.भोळे, अवर सचिव

*श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, वि.स.स. यांची राज्य मंत्रीमंडळात 'राज्यमंत्री' म्हणून दिनांक १८ नोव्हेंबर, २०१० रोजी नियुक्ती करण्यात आल्याने रिक्त झालेल्या जागी श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांची दिनांक १८ जानेवारी, २०११ पासून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

** श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांची दिनांक ६ ऑगस्ट, २०१० पासून पुर्ननियुक्ती करण्यात आली आहे.

*** श्री.बी.टी.देशमुख, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी संपुष्टात आल्याने सदरहू पद हे रिक्त आहे.

## प्रस्तावना

मी, उपविधान समितीचा समिती प्रमुख, समितीने तिच्या वतीने मला अहवाल सादर करण्यास अधिकार दिल्यानुसार समितीचा सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षातील कामकाजासंबंधीत दुसरा अहवाल सादर करीत आहे.

या अहवालात समितीने ११ प्रारुप अधिसूचना व ६७ अंतिम अधिसूचना विचारात घेतल्या.

समितीने आपल्या ५, १२, १९, २७ जानेवारी, २०११, २, ९, १०, १७, २१ फेब्रुवारी, २०११, ३ मार्च, २०११, २, ८, १५, २२, २४, २९ जून, २०११, ६, १३, २२ जुलै, २०११, ४, २६, २७ ऑगस्ट, २०११, २८ सप्टेंबर, २०११, ५, १२, १८ ऑक्टोबर, २०११, २, ९, २३ नोव्हेंबर, २०११, १८ जानेवारी, २०१२, २२ फेब्रुवारी, २०१२, २ व ३ मार्च, २०१२ अशा एकूण ३३ बैठका घेतल्या.

या बैठकांमध्ये समितीने ११ प्रारुप अधिसूचनांचे व ६७ अंतिम नियम प्रसिध्द करणाऱ्या अधिसूचनांचे परिक्षण केले. गृह विभाग (परिवहन), महिला व बालकल्याण, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी निर्गमित केलेल्या प्रारुप अधिसूचनांच्या संदर्भात तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाच्या अंतिम अधिसूचनांच्या संदर्भात समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर विचारविनिमय केला आणि तो संमत केला.

**विधान भवन** :
मुंबई,
दिनांक : १८ एप्रिल २०१२.

**चंद्रकांत दानवे,**
समिती प्रमुख,
उपविधान समिती.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| (एक) | **उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग** | १ |
| | **अंतिम अधिसूचना क्रमांक ७४ :** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम,२००७, प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/बेस्ट उपक्रम/६३०, दिनांकित २ एप्रिल, २००७. | |
| (दोन) | **गृह (परिवहन)विभाग** | ९ |
| | **अंतिम अधिसूचना क्रमांक १० :** महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ प्रसिद्ध करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०८०८/प्र.क्र.१५३/परि-२, दिनांकित २२ मार्च, २०११. | |
| (तीन) | **नगरविकास विभाग** | १२ |
| | **अंतिम अधिसूचना क्रमांक १४ :** मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/९४/ प्र.क्र.५९/ नवि-३२ (१) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | |
| (चार) | **अंतिम अधिसूचना क्रमांक १५ :** मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/९४/ प्र.क्र.५९/ नवि-३२ (२) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १२ |
| (पाच) | **अंतिम अधिसूचना क्रमांक १६ :** महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/नवि-३२ (७) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १२ |
| (सहा) | **अंतिम अधिसूचना क्रमांक १७ :** महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/नवि-३२ (८) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| (सात) | **अंतिम अधिसूचना क्रमांक १८ :** नागपूर शहर महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी २००९ / ९४/ प्र. क्र. ५९/नवि-३२ (३), दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१० | १२ |
| (आठ) | **अंतिम अधिसूचना क्रमांक १९ :** मुंबई महानगरपालिका (स्थायी समिती, सुधारणा समिती, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती, शिक्षण समिती, प्रभाग समित्या आणि इतर विशेष समित्या यांच्या सभापती पदांसाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/नवि-३२(४) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १२ |
| (नऊ) | **अंतिम अधिसूचना क्रमांक २० :** मुंबई प्रांतिक महानगर पालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/ नवि-३२ (५) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १२ |
| (दहा) | **अंतिम अधिसूचना क्रमांक २१ :** नागपूर शहर महानगरपालिका (स्थायी समिती, प्रभाग समित्या, विशेष समंत्रक समित्या यांच्या सभापतीची निवडणूक घेणे) सुधारणा नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी २००९/९४/प्र.क्र.५९/नवि-३२ (६), दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १२ |
| (अकरा) | **नगरविकास विभाग**<br>**अंतिम अधिसूचना क्रमांक ५९ :** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, २००९ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक-टिपीबी-४३०६/ २४३३/प्र.क्र.१९३/२००६/नवि-११, दिनांकित १४ डिसेंबर, २००९. | १८ |
| (बारा) | **गृह (परिवहन)विभाग**<br>**अंतिम अधिसूचना क्रमांक ८९ :** महाराष्ट्र मोटार वाहने (दुसरी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०८०७/ ८८७/ प्र.क्र.१२२/परि-२, दिनांकित १२ जानेवारी, २०१०. | ३१ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| (तेरा) | **गृह (परिवहन) विभाग**<br>**अंतिम अधिसूचना क्रमांक ११९ :** महाराष्ट्र मोटार वाहन (सहावी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०३१०/ ८८७/प्र.क्र.१८२/परि-२, दिनांकित १३ सप्टेंबर, २०१०. | ३४ |
| (चौदा) | **गृह (परिवहन) विभाग**<br>**अंतिम अधिसूचना क्रमांक १२० :** महाराष्ट्र मोटार वाहन (सातवी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०४०८/ ८७२/प्र.क्र.२१२/परि-२, दिनांकित १३ सप्टेंबर, २०१०. | ३६ |
| (पंधरा) | **गृह (परिवहन) विभाग**<br>**प्रारुप अधिसूचना क्रमांक - २४ :** महाराष्ट्र मोटार वाहन (आठवी सुधारणा) नियम, २०१० अन्वये प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्रमांक एमव्हीआर. ०८०९/२२२१/प्र.क्र.३५४/परि-२, दिनांकित, २० एप्रिल, २०१०. | ३९ |
| | **आणि** | |
| | **अंतिम अधिसूचना क्रमांक- १०२ :** महाराष्ट्र मोटार वाहन (पाचवी सुधारणा) नियम, २०१० अन्वये प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०८०९/ २२२१/प्र.क्र.३५४/परि-२, दिनांकित, १४ जुलै, २०१०. | ३९ |
| (सोळा) | **गृह (परिवहन) विभाग**<br>**प्रारुप अधिसूचना क्रमांक- १ :** महाराष्ट्र मोटार वाहन (नववी सुधारणा ) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमव्हीआर.०४१०/ ११२८/ प्र.क्र. २९५/परि-२, दिनांक २५ जून, २०१०. | ४८ |
| (सतरा) | **गृह (परिवहन) विभाग**<br>**प्रारुप अधिसूचना क्रमांक- ३० :** महाराष्ट्र मोटार वाहन (दहावी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०१०४/ प्र.क्र.४३/परि-२, दिनांकित ३० ऑक्टोबर, २०१०. | ४९ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| (अठरा) | **गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग**<br>**अंतिम अधिसूचना क्रमांक- ४९ :** शासन अधिसूचना गृह विभाग क्रमांक एआरएम १०९६/२१/२/इएक्ससी ३, दिनांकित १३ सप्टेंबर, १९९६ मध्ये आवश्यक बदल करण्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक बीडब्ल्यूआर ११०६/सीआर-१६/मायक्रोब्रुव्हरी/इएक्ससी-३, दिनांकित १० ऑगस्ट, २००९ | ५६ |
| (एकोणीस) | **गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग**<br>**अंतिम अधिसूचना क्रमांक- ५० :** शासन अधिसूचना, गृह विभाग क्रमांक बीपीए -११२००९/२००९-१०/VIII/दिनांकित ३१ जानेवारी,२००९ मध्ये सुधारणा करण्याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेली अंतिम अधिसूचना क्रमांक बीडब्ल्यूआर.११०६/ सीआर-१६ / मायक्रोब्रुव्हरी /इएक्ससी-३,दिनांकित १० ऑगस्ट, २००९ | ५७ |
| (वीस) | **गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग**<br>**अंतिम अधिसूचना क्रमांक- ६ :** महाराष्ट्र शासन, शासन अधिसूचना, गृह विभाग क्रमांक एआरएम १०९६/२१/२/इएक्ससी-३ दिनांकित १३ सप्टेंबर, १९९६ मध्ये दिनांक १ एप्रिल, २०११ पासून केलेली सुधारणा प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक एमआयएस ०२११/३३३/प्र.क्र.७६(१)/ इएक्ससी-३, दिनांकित ३० मार्च, २०११. | ५८ |
| (एकवीस) | नियम तयार करण्यास, तसेच विधानमंडळासमोर अधिसूचना ठेवण्यास आणि समितीच्या उपयोगासाठी कागदपत्रे पाठविण्यास झालेला विलंब याचे विवरण. | ६४ |
| (बावीस) | उपविधान समितीने विचारात घेतलेले प्रारुप नियम | ८१ |
| (तेवीस) | उपविधान समितीने विचारात घेतलेले अंतिम नियम | ८७ |
| (चोवीस) | कार्यावलीचे परिशिष्ट | १०३ |
| (पंचवीस) | बैठकीचे कार्यवृत्त | १२० |
| (सव्वीस) | उपविधान समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील. | १५८ |

## उर्जा विभाग

**अंतिम अधिसूचना क्रमांक :— ७४ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम,२००७, प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/बेस्ट उपक्रम/६३०, दिनांकित २ एप्रिल,२००७**

**उद्देश :**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

'विद्युत अधिनियम,२००३ मधील कलम १८१ च्या उप कलम (२) मधील खंड (डी) सह कलम १६ चे परंतुक आणि कलम १७२ च्या खंड (बी) ने प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने हे विनियम तयार केले आहेत. या विनियमामध्ये बेस्टने करावयाच्या वीज पुरवठयासाठीच्या परवान्याच्या विशिष्ट अटी नमूद करण्यात आल्या आहेत.

**गोषवारा**

या विनियमातील मुख्य तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.

या विशिष्ट अटी आणि परवान्याच्या सर्वसाधारण अटी या बेस्टच्या परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील.

वरील अटींद्वारे बेस्टने करावयाच्या विजेचे वितरण आणि किरकोळ पुरवठयाच्या कार्याचे नियमन करण्यात येईल.

या विनियमामध्ये बेस्टने विद्युत पुरवठा करावयाचे क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे'

ऊर्जा विभागाच्या १५ अधिसूचना या सचिवालयास एकत्रितरित्या दिनांक २० एप्रिल, २०१० रोजी प्राप्त झाल्या होत्या. त्या १५ अधिसूचना एकत्रितपणे दिनांक २ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या उपविधान समितीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवण्यात आल्या होत्या. या अधिसूचनांवर चर्चा करत असताना त्यात जे तांत्रिक शब्दप्रयोग आहेत त्यांचा खुलासा संबंधित विभागाच्या अधिका-यांकडून होऊ शकेल या उद्देशानेच समितीने संबंधित विद्युत नियामक आयोगाच्या अधिका-यांना या बैठकीस निमंत्रित केले होते.

या अधिसूचना विधानमंडळास वेळेवर पाठविणे आवश्यक होते. परंतु, सन २००५ पासूनच्या अधिसूचना आता पाठविण्यात आलेल्या आहेत. अधिसूचना क्रमांक १० तर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या राज्य सल्लागार समितीची मुदत संपल्यानंतर पाठविण्यात आलेली आहे. समितीकडे या अधिसूचनांच्या छाननीचे काम असते. अशाप्रकारे पाच-पाच, सहा-सहा वर्षांच्या अधिसूचना एकत्रित आल्यानंतर समिती त्या विचारात कधी घेणार ? अशी समितीने विचारणा केली असता ज्या-ज्या वेळेस या अधिसूचना येतात

त्याच्या पुढच्या अधिवेशनात त्या ठेवणे आवश्यक होते. परंतु, मंत्रालयाच्या ज्या विभागाकडे हा विषय देण्यात आला होता, ही बाब त्यावेळेस त्यांच्या लक्षात आली नाही. सन २००८ मध्ये जेव्हा नवीन रेग्युलेशन्स आले त्यावेळी अगोदरच्याही रेग्युलेशन्स विधानमंडळासमोर ठेवायला पाहिजे होत्या हे लक्षात आले. त्यामुळे आता त्या एकत्रितरित्या ठेवण्यात आलेल्या आहेत. विधानमंडळाकडे त्या सुरुवातीला पाठविल्या जाणे आवश्यक होते. यामध्ये विभागाची चूक झालेली आहे, हे मान्य करतो. तसेच समितीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या राज्य सल्लागार समितीबाबत जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत, या समित्यांची मुदत संपलेली नाही, त्या अस्तित्वात आहेत आणि त्यांच्या बैठकाही होतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले. या समितीची नियुक्ती शासनाकडून केली जाते का ? असे समितीने विचारले असता या समितीची नियुक्ती महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग करते असे विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

आयोगाकडून रेग्युलेशन्स कशाप्रकारे केली जातात याची माहिती विभागाच्या अधिका-यांनी समितीस द्यावी असे समितीने सांगितले असता विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, ज्या बाबींवर रेग्युलेशन्स करता येतात त्यांची यादी दिलेली आहे. त्याप्रमाणे रेग्युलेशन्सचे प्रारुप केले जाते. आयोगाच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन अंतिम प्रारुपाचे काम केले जाते. त्यानंतर लोकांकडून सूचना मागविल्या जातात त्यासाठी साधारणतः एक महिन्याचा कालावधी दिला जातो. त्यानंतर या सर्वांची छाननी करुन अधिसूचनेचे अंतिम प्रारुप केले जाते.

लोकांना माहिती मिळण्यासाठी वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये अशी अधिसूचना प्रसिध्द केली जाते. तसेच, आयोगाच्या वेबसाईटवरही तिची प्रसिध्दी केली जाते, असे विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले. त्यावर समितीने विधानसभा सभागृहाच्या पटलावर अधिसूचना ठेवण्यात आल्यानंतर संबंधित विभागाकडून त्या छाननी करण्याकरिता उपविधान समितीकडे पाठविल्या जातात. समितीकडे या अधिसूचना आल्यानंतर समिती त्यांची छाननी करते. छाननीच्या अनुषंगाने संबंधित विभागांच्या अधिका-यांची साक्ष घेतली जाते. नियम अस्तित्वात येण्यापूर्वी त्यामध्ये जर काही त्रुटी असतील तर त्या शोधून दूर करण्याचे, त्यांची छाननी करण्याचे काम समिती करते. परंतु, समितीला जर अधिसूचना वेळेत प्राप्त झाल्या नाहीत तर समिती त्याची छाननी केव्हा करणार असे विचारले असता विद्युत नियामक आयोगाच्या सचिवांनी उक्त अधिसूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास उशीर झाला हे मान्य केले आहे. त्यावर समितीने यापुढे अधिसूचना विभागामार्फत राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत समितीकडे छाननीसाठी पाठविल्या गेल्या पाहिजेत, असे निदेश दिले.

विद्युत निर्मिती, पारेषण आणि वितरण यासंबंधीचे अधिकार शासन व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास दिले आहेत. फेजच्या बाबतीत विधानमंडळात झालेल्या चर्चेच्या वेळी ५०० कोटी रुपये आयोगास देण्याचे ठरले होते. सिंगल फेजची यंत्रणा राज्यातील सर्व विभागात लागू होईल असे सांगितले

गेले होते, परंतु त्याबाबतीत काही प्रगती झालेली दिसून येत नाही. सिंगल फेज सारखे धोरणात्मक प्रश्न आयोगाच्या पुढे कशा पध्दतीने येतात आणि ते कसे सोडविले जातात याची समितीला माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी माहिती दिली की, अशा प्रश्नांच्या बाबतीत आयोगासमोर पिटीशन दाखल केले जाते. त्या पिटीशनची आयोगामार्फत सुनावणी होते, त्यानंतर आयोग निर्णय घेत असतो. टाटा आणि रिलायन्स या वीज वितरण कंपन्या आहेत, त्या कंपन्यांना काही अडचणी आल्या तर त्या कंपन्या आयोगासमोर अडचणी संदर्भात पिटीशन दाखल करतात. त्या पिटीशनच्या अनुषंगाने आयोगासमोर सुनावणी घेण्यात येते आणि त्यानंतर आयोगाकडून योग्य तो निर्णय देण्यात येतो.

त्यानंतर विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी कमिटीचे काम विषद केले. कमिटीकडून विजेचे दर फायनल केले जातात व ते दर आयोगाच्या निदर्शनास आणले जातात व त्यानंतर त्यासंबंधी निर्णय घेतला जातो. तसेच वीज वितरण कंपन्या आहेत, त्यांच्या अडचणी समजावून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. आयोगाकडून विजेचे दर निश्चित केले जातात.

वीज निर्मितीच्या बाबतीत सरकारच्या धोरणामध्ये होत असलेले बदल तसेच वीज निर्मितीसाठी लागणारे रॉ मटेरियल चांगल्या प्रतीचे नसल्यामुळे वीज निर्मितीची कॉस्ट वाढते. आयोगाकडून फक्त विजेचा दर निश्चित केला जातो. वीज निर्मिती प्रकल्पातील अव्यवस्थेमुळे निर्मितीची कॉस्ट वाढते आहे. त्यांचे नियंत्रण न करता वीज दरवाढ ग्राहकांवर लादली जाते हे बरोबर नाही असे मतप्रदर्शन करुन त्या प्रकल्पांवर, वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर आयोगाकडून नियंत्रण का ठेवले जात नाही? या व्यवस्थेवर नियंत्रण कोणाचे आहे? असे समितीने विचारले असता विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, सध्या वीज निर्मितीची कॉस्ट वाढत चालली आहे. या गोष्टीशी आयोगाचा संबंध आहे. सुरुवातीला आयोगाच्या कामाचे स्वरुप वेगळे होते आणि आता वेगळे आहे. वीज निर्मिती प्रकल्पांकडे काही वीज वितरण कंपन्या ओपन बिडिंग करतात. बिडींग प्रोसेस पूर्ण केल्यानंतर निर्मित केलेली वीज वितरण कंपन्यांना दिली जाते. या वीज निर्मिती कंपन्यांवर व त्यातून निर्माण झालेली वीज व तिचे वितरण यासंदर्भात आयोगाचे नियंत्रण आहे. सध्या कॉस्ट प्लस सिस्टीम असल्यामुळे खर्च वाढत गेला आहे. मुंबई क्षेत्रात कमीत कमी दरात विद्युत वितरण करण्याऱ्या कंपन्यांना लायसन्स दिले जाते व तशी पध्दत स्वीकारलेली आहे. वीज निर्मितीची कॉस्ट वाढत चालली आहे. वीज निर्मिती आणि पारेषण व वितरण यातून त्यांना जो नफा होतो, त्यातून खर्च भागवित असतात, वीज वितरण कंपन्यांना वीज उपलब्ध करुन देण्यासंदर्भात टेंडरचा खर्च आयोगामार्फत केला जातो. त्यानंतरचा खर्च मात्र वितरण कंपन्या करीत असतात. इलेक्ट्रीक सेक्टरच्या बाबतीत विद्युत निर्मिती, पारेषण आणि वितरण यासंबंधीचा खर्च विचारात घेऊन नंतरच घरगुती ग्राहकांना कमी दराने वीज देतो आणि जे मोठे ग्राहक आहेत त्यांना जास्त दर लावतो. मोठया ग्राहकांना कमर्शियल दर आकारला जातो. त्यामुळे वीज निर्मिती, पारेषण व वितरण यांची

खर्चाची कॉस्ट ॲडजेस्ट होते. अडचण अशी झाली की, सोशल इक्विटी म्हणून ज्यांना कमी दराने वीज देतो व त्यास आपण सबसिडी म्हणतो. ही सिस्टीम लागू केल्याने नफा कमी होतो ही वस्तुस्थिती आहे, त्या कंपन्याना काही फायदा झाला नाही, हा कॅपिटल एक्सपेंडिचरचा भाग झाला. वीज वितरण कंपन्यांना नेहमीप्रमाणे फायदा देता येत नाही.

ऊर्जा विषयात खूप टेक्निकल शब्द आहेत व शब्दांचे अर्थ समजावून घेण्यासाठी आपल्याला समितीसमोर बोलविले आहे. आपण १५ अधिसूचना समितीकडे पाठविल्या आहेत, त्यात अनेक टेक्निकल शब्द आहेत. त्या शब्दांचा अर्थ समजावा म्हणून आपण प्रत्येक अधिसूचनेसमवेत स्पष्टीकरण द्यावयास पाहिजे होते. परंतु आपण कोणत्याही अधिसूचनेचे स्पष्टीकरण दिलेले नाही असे समितीच्या निदर्शनास आले आहे. या अधिसूचनेचे स्पष्टीकरण न देण्यामागचा हेतू काय आहे ? शासनाच्या विविध विभागांकडून समितीकडे अधिसूचना पाठविल्या जातात, परंतु त्या अधिसूचनेसमवेत त्यासंबंधीचे स्पष्टीकरण दिले जाते. या अधिसूचनांच्या बाबतीत काय करता येईल त्याबाबतची समितीला माहिती द्यावी अशी समितीने विचारणा केली असता त्यावर विद्युत नियामक आयोगाच्या सचिवांनी सांगितले की, अधिसूचनेमध्ये टेक्निकल शब्द असेल, टेक्निकल क्लॉज असेल त्याचे स्पष्टीकरण आयोगाला शक्य असेल तर आयोगाने अधिसूचनेचा प्रारुप तयार झाल्यानंतर तो प्रारुप समितीकडे छाननीसाठी पाठविला पाहिजे. अधिसूचना प्रसिध्द करुन लोकांकडून सूचना आणि हरकती मागविल्या जातात त्याचे रेकॉर्डदेखील समितीला उपलब्ध करुन दिले तर ते छाननीसाठी सोयीचे होईल. अधिसूचनेचे प्रारुप व उपलब्ध असलेले रेकॉर्ड समितीकडे छाननीसाठी पाठविले तर त्यात अधिक स्पष्टता येईल.

मुळा-प्रवराचे महावितरण-कंपनीमध्ये विलिनीकरण झालेले आहे. परंतु त्यापूर्वी मुळा-प्रवराकडे प्रलंबित असलेल्या २३०० कोटी रुपयांचे ऑडिट होणे गरजेचे आहे. असे समितीने प्रतिपादन केले असता विद्युत नियामक आयोगाच्या सचिवांनी सांगितले की, शासनाकडून त्यांना निधी दिलेला नाही, ही रक्कम थकबाकीमुळे झाली आहे. या संदर्भात पहिली बाब थकीत रकमेच्या संबंधात आहे. त्यावेळी झालेल्या शासन निर्णयात असे नमूद होते की, प्रत्येक वर्षी शासनाकडून त्यांना ७२ कोटी रुपयांची सबसिडी दिली जाईल. त्याचबरोबर उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी काही सुधारणा कराव्यात असे अपेक्षित होते. परंतु संबंधित संस्थेकडून तशा प्रकारे कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. त्यामुळे त्यांना शासनाकडून सबसिडी देण्यात आली नाही. यात जवळपास ४ ते ५ वर्षांचा कालावधी उलटून गेला. त्यानंतर महावितरण कंपनीने एमईआरसीला सांगितले की, संबंधित संस्था ठरवून दिलेल्या नियमानुसार रक्कम अदा करीत नाहीत, त्यामुळे त्यांचे लायसन्स रद्द करावे. या संदर्भात गेल्या ३ वर्षापासून लायसन्स रद्द करण्यासाठी एमईआरसीची प्रक्रिया सुरु होती. हे प्रकरण उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात गेले. परंतु त्या ठिकाणी त्यांना दाद मिळू शकली नाही. त्यानंतर ३१ जानेवारी,२०११ रोजी मुळा-प्रवराच्या लायसन्सची मुदत संपली. तत्पूर्वी दि. २७ जानेवारी, २०११ रोजी एमईआरसीने सांगितले की, या संदर्भात आपली आर्थिक कुवत नसल्यामुळे पुढील लायसन्स महावितरण कंपनीला दिले जाईल.

समितीने वीज क्षेत्रातील तांत्रिक बाबी समजून घेण्यासाठी तसेच या अधिनियमासंबंधी वीज नियामक आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून अधिक माहिती जाणून घेण्यासाठी व त्यावर विचार करण्यासाठी चंद्रपूर महाऔष्णिक वीजनिर्मिती केंद्राला दिनांक २६ ऑगस्ट, २०११ रोजी भेट दिली व विद्युत नियामक आयोगाच्या अधिकाऱ्यांची तसेच अन्य कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. त्यावेळी चंद्रपूर महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या वतीने तयार करण्यात आलेल्या माहितीचे सादरीकरण करण्यात आले. त्याबाबत वीज निर्मिती कंपनी, वीज वितरण कंपनी व वीज पारेषण कंपनीच्या प्रतिनिधींनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

'चंद्रपूर महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रामध्ये वीज तयार करण्यास दिनांक १५ ऑगस्ट, १९८३ मध्ये सुरुवात झाली. युनिट क्रमांक १ चे वय आता २८ वर्षे आहे, युनिट क्रमांक २ चे २७ वर्षे, युनिट क्रमांक ३ चे २६ वर्षे, युनिट क्रमांक ४ चे २५ वर्षे, युनिट क्रमांक ५ चे २० वर्षे, युनिट क्रमांक ६ चे १९ वर्षे आणि युनिट क्रमांक ७ चे वय १२ वर्षे आहे. या सर्व युनिट्सची एकत्रित वीज निर्मिती क्षमता २३४० मेगावॅट एवढी आहे. २१० मेगावॅटच्या चारही युनिटस्चे वय २५ वर्षांच्या वर असल्यामुळे वीज निर्मितीची इफिशिअन्सी कमी झाली आहे.

या वीज केंद्रासाठी कोळसा आणि पाण्याची आवश्यकता असते. वीज निर्मिती कंपनीचा स्वतःचा एराई डॅम आहे व त्याद्वारे पाण्याची उपलब्धता करण्यात येते. डब्ल्यूसीएल, एसईसीएल, एमसीएल यांच्या माध्यमातून कोळसा मागविला जातो. कोळशाचे एकूण २० ते २५ प्रकार आहेत. या वीज निर्मिती केंद्राला दररोज १० ते १२ रेल्वे रेक्स, म्हणजेच ४०,००० मेट्रिक टन कोळसा लागतो.

या वीज निर्मिती केंद्रास क्वालिटी मॅनेजमेंट सिस्टिमसाठी सन १९९८ पासून आयएसओ : ९००१, सन २००४ पासून पर्यावरण व्यवस्थापन कार्यप्रणालीसाठी आयएसओ :१४००१ आणि हेल्थ अॅण्ड सेफ्टीसंदर्भात सन २००७ पासून आयएसओ :१८००१ दर्जा बहाल करण्यात आलेला आहे.'

चर्चेदरम्यान समितीने पुढील मुद्दे उपस्थित केले :- पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून धुतलेला कोळसा वीज निर्मिती केंद्रात वापरण्यात येतो व त्यासाठी या भागामध्ये अनेक खाजगी कोल वॉशरिज आहेत. परंतु कोल वॉशरिज कंपन्यांनी धुतलेला कोळसा दिला आणि वीज केंद्राला कोळसा मिळाला, असे फक्त कागदावरच केले जाते. प्रत्यक्षात धुतलेला कोळसा वीज निर्मिती केंद्राला पाठविण्यात येत नाही. या खाजगी कंपन्यांना मात्र त्याची देयके अदा केली जातात. म्हणजेच कोळसा वॉश न करता पाठविल्याची बोगस नोंद करण्यात येते व त्यांना देयके अदा केली जातात. यामुळे न धुतलेला कोळसा वीज केंद्रात येतो व त्यामधून आवश्यक तेवढी वीज तयार होत नाही. तसेच, पर्यावरणाचाही ऱ्हास होतो. साधारणपणे ३०० टन कोळसा जाळल्यानंतर ५०० मेगावॅट वीज निर्मिती झाली पाहिजे. मात्र, ३१४ टन कोळसा जाळल्यानंतरही फक्त ३५० मेगावॅट वीज निर्मिती होते, हे कशाचे द्योतक आहे ? आपण जर खाजगी वीज निर्मिती केंद्रे बघितली

तर त्या ठिकाणी ३०२ टन कोळसा जाळला जातो व त्यामधून ३७७ मेगावॅट वीज निर्मिती केली जाते. त्यामुळे वॉशरिजचा मुद्दा अतिशय महत्वाचा असून याबाबतची चौकशी झाली पाहिजे असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, या केंद्रास दररोज ४०,००० मेट्रिक टन कोळशाची आवश्यकता असते व त्यापैकी फक्त ८ टक्के वॉश कोलचा वापर होतो.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, एकूण ८ टक्के वॉश कोल या केंद्रात वापरण्यात येतो. मात्र वॉशरिजकडून फक्त ४ टक्केच वॉश कोलचा सप्लाय करण्यात येतो व त्यांना ८ टक्के वॉश कोलचे पैसे अदा केले जातात. जो कोळसा वॉशिंगसाठी जातो, त्यामधील १० टक्के कोळसा बाजूला काढण्याची परवानगी शासनाने दिलेली आहे. खराब प्रतीचा कोळसा बाजूला ठेवल्यानंतर चांगल्या प्रतीचा कोळसा या कंपन्यांनी वीज निर्मिती केंद्राला पाठवावयास हवा, अशी अपेक्षा आहे. जर या वॉशरिजकडून संपूर्ण ८ टक्के वॉश कोल पाठविला जात असेल तर आवश्यक तेवढे विजेचे उत्पादन व्हावयास हवे. परंतु, त्या प्रमाणात उत्पादन होत नाही. खराब प्रतीचा कोळसा बाजूला करुन वीज निर्मितीसाठी योग्य असलेला वॉश कोळसा या कंपन्यांनी आपल्याला पाठविला पाहिजे. अशाप्रकारचा कोळसा या केंद्राला मिळतो का ? त्यावर विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, एकूण वीज निर्मितीसाठी लागणाऱ्या कोळशापैकी ८ टक्के धुतलेला कोळसा असतो. धुतलेला ८ टक्के व इतर ९२ टक्के एकत्रित कोळशातून वीज निर्मिती होते. जो कोळसा वीज निर्मिती केंद्राला पाठविण्यात येतो, त्याची शास्त्रीय तपासणी केली जाते. किती कॅलरीचा कोळसा आहे, याचे मोजमाप कंपन्यांना कोळसा देण्याअगोदर व कंपन्यांकडून कोळसा प्राप्त झाल्यानंतर केले जाते. कराराप्रमाणे कोळसा मिळाला असेल तर तो स्वीकृत केला जातो. अन्यथा, रिजेक्ट केला जातो.

आपण दररोज ४० हजार टन कोळसा जाळतो. त्याची राख किती येते ? त्या राखेचे काय करतो ? असे समितीने विचारले असता, विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी माहिती दिली की, कोळसा जाळल्यानंतर त्याची साधारणतः १५ ते १६ हजार टन राख राहते सदर राख सिमेंट कंपन्या घेऊन जातात. रॉ कोळसा वापरल्यामुळे ॲश थोडी जनरेट होते. ती ॲश सिमेंट कंपन्या मोफत घेऊन जातात. एसीसी, अंबुजा वगैरे कंपनी बरोबर ॲश मोफत घेऊन जाण्यासंबंधी १५ ते २० वर्षाचे करार करण्यात आलेले आहे.

कोळसा व्यवस्थितपणे धुतलेला आहे हे तपासण्यासाठी आपल्याकडे काही यंत्रणाआहे काय ? असे समितीने विचारले असता कोळसा व्यवस्थितपणे धुतलेला आहे किंवा नाही याचे नियंत्रण थर्ड पार्टीकडून करण्यात येते. IGM, SDF या दोन कंपन्या धुतलेल्या कोळशाची चाचणी करतात. नॉर्म्सप्रमाणे नसेल तर कोळसा धुऊन आला नाही असे घोषित केले जाते. आपल्याला पॅरामीटर नेमून दिलेले आहेत. त्याप्रमाणे कोळसा घेतो. अशी विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी माहिती दिली.

कोल माईन्सकडून कोणत्या ग्रेडिंगचा कोळसा आपल्याकडे येतो ? ग्रेडिंगप्रमाणे देयके अदा केली जातात का ? यासंदर्भातील कार्यपध्दती कशी आहे ? कोळसा खरेदीचा निर्णय कोणाकडून घेण्यात येतो ? असे समितीने विचारले असता विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, या केंद्राला 'टी' ग्रेडचा कोळसा प्राप्त होतो. आवश्यक असणाऱ्या प्रतीचा कोळसा प्राप्त झाला नाही तर जनरेशन कमी होते किंवा पाहिजे तेवढे जनरेशन करण्यासाठी जास्त कोळसा लागतो. मुख्यालयाकडून कोळसा खरेदीचा निर्णय घेण्यात येतो.

सादरीकरणाच्या दरम्यान विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, डब्ल्यूसीएलकडून कशाप्रकारे चिखलसदृश (मडी) कोळसा या विद्युत केंद्रास प्राप्त होतो. हा रॉ कोल आहे. डब्ल्यूसीएल बरोबर कंपनीचे फ्युएल सप्लाय ॲग्रिमेंट झालेले आहे. ॲग्रिमेंटमध्ये नमूद केलेल्या प्रतीचा कोळसा डब्ल्यूसीएलने विद्युत निर्मिती केंद्राला दिला पाहिजे. प्रत्येक तिमाहीमध्ये पुरविण्यात आलेल्या कोळशाचे मोजमाप होते, दर्जा तपासला जातो व त्याप्रमाणे देयक अदा केले जाते. डब्ल्यूसीएलचे अधिकारी, विद्युत निर्मिती केंद्राचे अधिकारी यांच्यामार्फत कंबाइन ॲनालिसिस होते व त्याप्रमाणे देयक अदा केले जाते. जो कोळसा डब्ल्यूसीएलकडून पाठविण्यात येतो, त्याचे कंबाईन ॲनालिसिस करण्यात येते व त्याप्रमाणेच त्याना देयक अदा केले जाते.

उपरोक्तप्रमाणे चर्चा झाल्यानंतर समितीने उर्जा विभागाकडून प्राप्त झालेल्या अंतिम अधिसूचना क्र.७४ वर खालीलप्रमाणे विचारविनिमय केला.

उक्त अधिसूचना विचारात घेते वेळी समितीने विचारले की, बेस्टच्या विजेचे दर आपण ठरविले आहेत. बेस्ट हा सार्वजनिक उपक्रम आहे. रिलायन्स, टाटा या खाजगी विद्युत कंपन्या आहेत. या कंपन्यांचे विजेचे रेट आपण ठरविले आहेत हे बरोबर आहे. ग्राहकांना वीज कोणत्या दराने द्यावी यासंबंधी आपण बंधने घातली आहेत. महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त दराने वीज देण्याचे, त्यापेक्षा थोड्या जास्त दराने औद्योगिक क्षेत्राला वीज देण्याचे धोरण स्वीकारले आहे. कोणत्या दराने ग्राहकांना वीज द्यावी हे ठरविण्याचा अधिकार बेस्ट उपक्रमाचा आहे. तो एमइआरसीला नाही, शासकीय वीज कंपनीला सरकार विजेसाठी सबसिडी देऊ शकते. मुंबई महानगरपालिका स्वायत्त संस्था असल्यामुळे बेस्ट उपक्रमाला विजेसाठी सबसिडी देता येत नाही. मुंबई शहर जिल्ह्यामध्ये बेस्ट उपक्रमातर्फे वीज पुरवठा करण्यात येतो, तर मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये रिलायन्स कंपनी तर्फे वीज पुरवठा करण्यात येतो. मुंबई शहरात वर्षानुवर्षे बेस्ट उपक्रमातर्फे वीज पुरवठा करण्यात येतो. तसेच, परिवहन सेवा देखील मुंबईतील नागरिकांना पुरविण्यात येते. बेस्ट उपक्रमाचा परिवहन विभाग हा तोट्यात चालतो. त्यामुळे विद्युत विभागाचा नफा परिवहन विभागामध्ये दाखविण्यात येतो. विद्युत विभागाचे प्रॉफिट परिवहन विभागामध्ये मर्ज करायचे नाही असे आपले म्हणणे आहे. ते योग्य नाही. वीज नियामक आयोगाने आपले अधिकार योग्य रितीने वापरले

पाहिजेत. विजेच्या दरासंबंधी ग्राहक कक्षाकडे तक्रार करता येते. परंतु, आपण जे निर्बंध आणले आहेत त्यामुळे वेगळी परिस्थिती निर्माण होते, असे समितीने निदर्शनास आणले असता विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, वीज खरेदीवेळी कलम ६२ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. देशात जेवढे म्हणून वीज नियामक आयोग आहेत त्यांना वीज दर ठरविण्याचा अधिकार आहे. कलम ६२ आणि ८६ मध्ये प्रोसिजर कशी आहे, हे नमूद केलेले आहे. बेस्टचे चेअरमन यांनी देखील मुद्दा उपस्थित केला होता की, 'बेस्ट' हा सार्वजनिक उपक्रम आहे. त्यामुळे सूट देण्यात यावी. त्यांनी अशीही विनंती केली होती की, जो पर्यंत बेस्ट समितीच्या मार्फत पिटीशन दाखल होत नाही तो पर्यंत ते व्हॅलिड ठरवू नये. त्यावेळी नियामक आयोगाने सांगितले की, हा आपला अंतर्गत मुद्दा आहे. बेस्ट उपक्रमाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी महाव्यवस्थापक आहेत. तत्कालीन महाव्यवस्थापक यांच्याकडे विभागाने बेस्ट समितीची मान्यता घेऊन पिटीशन दाखल करावे अशाप्रकारची सूचना केली होती. त्यावेळी त्यांनी बेस्ट समिती समोर प्रस्ताव सादर केला होता पण त्यांनी मान्यता दिली नाही. नियामक आयोगाने बेस्ट उपक्रमाला डेड लाईन दिली होती व बेस्ट समितीला वारंवार विनंती करून देखील त्यांनी प्रस्तावास मान्यता न दिल्यामुळे विभागाने हा प्रस्ताव वीज नियामक आयोगाकडे पाठविला आहे, असे तत्कालीन महाव्यवस्थापक यांनी विभागास सांगितले. विजेचे दर ठरविण्याचा अधिकार बेस्ट उपक्रमाला आहे. बेस्ट उपक्रमाचे विजेचे दर महाराष्ट्रात सर्वात कमी आहेत. याला कारण बेस्ट समिती आहे. बेस्ट समितीचे सदस्य लोकप्रतिनिधी आहेत. बेस्ट उपक्रमाने टाटा कंपनी बरोबर लॉग टर्म पॉवर पर्चेस करार केलेले आहे त्यामुळे त्यांना वीज दरासंबंधी फायदा होतो. नवीन कायद्यामुळे बेस्ट उपक्रमाला संधी खुली झाली होती. बेस्ट उपक्रमाने टाटा वीज कंपनी बरोबर पॉवर पर्चेस करार केलेले आहे. त्यामुळे आता रिलायन्स वीज कंपनीने देखील त्या प्रमाणे पावले टाकण्यास सुरूवात केलेली आहे.

बेस्ट उपक्रमाला वीज पुरवठ्यामुळे उत्पन्न मिळते. पण त्यावर आपण निर्बंध का घातले आहेत ? असे समितीने विचारले असता, विद्युत नियामक आयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, बेस्ट उपक्रम परिवहन सेवेचा तोटा विद्युत पुरवठा विभागामध्ये दाखवते. त्यामुळे विद्युत पुरवठा विभाग देखील फायद्यामध्ये असून तोट्यात जाते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे परिवहन सेवेचा तोटा विद्युत विभाग भरून काढते. यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने असे भाष्य केले आहे की, बेस्ट उपक्रम लोकल सेल्फ बॉडीज असल्यामुळे परिवहन विभागाचा तोटा विद्युत विभागामध्ये दाखवू शकते. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आम्हाला बंधनकारक आहे. त्यामुळे त्यावर भाष्य करणे योग्य होणार नाही. आम्हाला सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय मान्य आहे. सर्वोच्च न्यायालयाने सदरहू निर्णय एप्रिल २०११ मध्ये दिलेला आहे.

**अंतिम अधिसूचना क्रमांक ७४ बाबत समितीने वरीलप्रमाणे विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

## गृह (परिवहन)विभाग

**अंतिम अधिसूचना क्रमांक १० : महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०८०८/प्र.क्र.१५३/परि-२, दिनांकित २२ मार्च, २०११**

**उद्देश :**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

'राज्यातील शहरे व महानगरामध्ये राहत्या घरांपासून शाळेचे अंतर जास्त असल्याने शाळेत जाणेकरीता बस, टॅक्सी, रिक्षा, मारुती व्हॅन यासारख्या वाहनांचा वापर केला जातो. या सर्व वाहनांमध्ये विहीत क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक केली जाते. तथापि, अशावेळी केलेली सुरक्षाविषयक उपाययोजना अपुरी पडते. यामुळे वाहनांना अपघात होऊन विद्यार्थ्यांच्या जीवितास हानी पोहचते. असे अपघात टाळण्यासाठी व शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या अनुषंगाने ठोस उपाययोजना आखणे आवश्यक होते.

केंद्रीय मोटार वाहन कायदा, १९८८ केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ व महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मध्ये शालेय वाहतुकीचे नियमन करणारी विशेष तरतूद नाही, त्यामुळे सध्या या वाहतूकीचे नियंत्रण करताना मोटार वाहन विभाग, वाहतूक पोलीस विभाग व शालेय प्रशासन यांना अडचणी येत आहेत. यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर येत असून ही व्यवस्था सुरक्षित होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गठीत केलेल्या समितीच्या शिफारशी, परिवहन आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील समितीने विविध संघटना, लोकप्रतिनिधी, शालेय प्रशासन व शिक्षक, वाहतूक संघटना, पालक संघटना, बस संघटना, रिक्षा संघटना यांचेबरोबर वेळोवेळी बैठका घेऊन अंतिम नियमावली तयार करुन शासनास सादर केली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ बाबतच्या नियमावलीस विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यात आली असून महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग-४-अ मध्ये दिनांक २२ मार्च, २०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. आता सदरहू अंतिम अधिसूचना उप विधान समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे'.

विभागाकडून प्राप्त झालेल्या उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने दिनांक २४ जून, २०११ रोजी समितीने गृह (परिवहन) विभागाच्या अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या दरम्यान नागपूर येथे विद्यार्थ्यांची ने-आण करणा-या रिक्षांनी सध्या संप पुकारलेला असल्यामुळे पालक चिंतातूर झालेले आहेत असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एका रिक्षातून तीन प्रवासी वाहून नेण्याचा परवाना दिला जातो. परंतु रिक्षावाला जेव्हा विद्यार्थ्यांना शाळेत सोडायला जाईल तेव्हा त्या रिक्षामध्ये केवळ ५ विद्यार्थीच त्याला बसविता येतील. एका रिक्षातून पाच विद्यार्थी नेण्याची परवानगी

रिक्षाला दिलेली आहे. परंतु रिक्षावाले ५ विद्यार्थ्यांना न बसविता १०-१५ विद्यार्थी रिक्षामध्ये बसवत असतात. रिक्षामध्ये पाच विद्यार्थी बसवले गेले तर त्याला कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही. परंतु ५ विद्यार्थी बसविणे त्यांना परवडत नाही असे रिक्षा संघटनेचे म्हणणे आहे. रिक्षामध्ये जास्त विद्यार्थी कोंबणे हे धोकादायक आहे. मॅजिकसारखी जी वाहने आहेत अशा वाहनांमधून ७ ते १२ विद्यार्थ्यांची ने-आण करता येऊ शकते.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण भागात मॅजिक गाडीचा स्कूल बस म्हणून सर्रास वापर केला जात आहे. त्यामुळे मॅजिक वाहन मालकांनी शासनाकडून विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी परवानगी घेतली आहे काय ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ज्यांनी अशा प्रकारची परवानगी घेतलेली नाही त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

समितीने असे निदर्शनास आणून दिले की, स्कूल बस म्हणून जी वाहने वापरली जातात त्या वाहनांनी खरेतर इतर प्रकारची कोणतीही वाहतूक करता कामा नये. परंतु शनिवार व रविवारच्या दिवशी ब-याच स्कूलबसचा वापर पिकनिक बस म्हणून केला जात असतो. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, स्कूल बसच्या वाहनांनी अशा प्रकारे उपयोग केला तर त्यांना सवलत मिळणार नाही. स्कूलबसच्या एका जागेसाठी वर्षाला १०० रुपये कर द्यावा लागत असतो. परंतु स्कूल बसने दुसरी वाहतूक केली तर त्यांना रीतसर कर भरावा लागेल.

स्कूल बस कशी असावी, रंग कसा असावा, दरवाजे कसे असावे यासंदर्भात सर्व निर्देश सुप्रीम कोर्टाने दिलेले आहेत. संपूर्ण भारतामध्ये स्कूल बसचा रंग सारखाच आहे. त्यामुळे स्कूल बस चालकांनं इतर कोणतीही वाहतूक करु नये यासंदर्भात नियम केलेले आहेत. स्कूल बससाठी वर्षाकाठी एका सीटसाठी १०० रुपयांचा कर आकारला जातो म्हणजे दर महिन्याला एका विद्यार्थ्याच्या पाठीमागे केवळ पाच साडेपाच रुपये कर आकारला जातो, या बाबी समितीने उद्धृत केल्या असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, स्कूल बस चालकास ५ वर्षांचा अनुभव असावा, केअर टेकर असावा अशा प्रकारच्या ब-याचशा अटी घातलेल्या आहेत. खरे म्हणजे महिन्यातून एकदा पालकांनी या बसमधून प्रवास केला तर सर्व परिस्थिती पालकांना समजून येईल. तसेच सुप्रीम कोर्टाच्या संपूर्ण निर्देशांचे पालन केले जाते.

अधिसूचनेच्या नियम ४ अन्वये, शाळेतील मुलांची ने-आण करण्याकरिता कंत्राटी वाहन परवाना देणे, या संदर्भात समितीने स्कूल बस कंत्राटी वाहन म्हणून परवाना दिल्यानंतर त्याबाबतीत अनियमितता होते की नाही हे तपासण्यासाठी कोणती यंत्रणा आहे ? या समितीच्या विचारणेवर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, प्रत्येक जिल्ह्याकरिता पोलीस आयुक्त किंवा जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली एक जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती राहाणार आहे. त्या समितीमध्ये परिवहन प्राधिकरणाचादेखील एक प्रतिनिधी राहाणार आहे.शाळेवर देखील यासंबंधातील जबाबदारी टाकलेली आहे. हे नियम दिनांक २२ मार्च २०११ ला लागू केलेले आहेत. याबाबतीत परिवहन विभागाची कार्यवाही पूर्णपणे झालेली आहे. आता याबाबतीत सर्व शाळांना शिक्षण विभागातर्फे निर्देश देण्याची आवश्यकता आहे.

अधिसूचनेतील नियम ६ अन्वये वाहन तळ आणि वाहन थांबे या संदर्भात समितीने पृच्छा केली की, ज्या शाळेकडे स्कूल बसच्या पार्किंगची व्यवस्था नाही किंवा वाहन तळ नाही त्याबाबतीत नियमामध्ये कोणती तरतूद करण्यात आलेली आहे ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जेथे स्कूल बसच्या पार्किंगसाठी शाळेची जागा नाही अशा स्कूल बसकरिता यथोचित ठिकाणी वाहनतळ आणि वाहन थांबे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे नियमामध्ये म्हटलेले आहे. समितीने विचारणा केली की, 'स्कूल बस म्हणून वापरण्यात येणारे वाहन सुरुवातीच्या नोंदणीच्या दिनांकापासून १५ वर्षांहून अधिक जूने असता कामा नये' असे नियमामध्ये म्हटलेले आहे. परंतु सर्व गाड्या ह्या १५ वर्षांहून अधिक जुन्या असल्याचे दिसतात. सर्वसाधारणपणे गाडीचे वय किती असले पाहिजे ?

त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ऑल इंडिया टुरिस्ट परमिट असलेली गाडी ९ वर्षापेक्षा जास्त जूनी असता कामा नये. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबईमध्ये ही मर्यादा ८ वर्षे इतकी आहे तसेच गाडी सीएनजीवर असणे गरजेचे आहे.

**समितीने उक्त अधिसूचनेवर वरीलप्रमाणे सविस्तर विचारविनिमय केला व या अंतिम अधिसूचनेसंदर्भात कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

## नगरविकास विभाग

**(१) अंतिम अधिसूचना क्रमांक १४ :** मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/नवि-३२ (१) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०.

**(२) अंतिम अधिसूचना क्रमांक १५ :** मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/नवि-३२ (२) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०.

**(३) अंतिम अधिसूचना क्रमांक १६ :** महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/ नवि-३२ (७) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०.

**(४) अंतिम अधिसूचना क्रमांक १७ :** महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/ नवि-३२ (८) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०.

**(५) अंतिम अधिसूचना क्रमांक १८ :** नागपूर शहर महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी २००९ / ९४/ प्र. क्र. ५९/नवि-३२ (३), दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०

**(६) अंतिम अधिसूचना क्रमांक १९ :** मुंबई महानगरपालिका (स्थायी समिती, सुधारणा समिती, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती, शिक्षण समिती, प्रभाग समित्या आणि इतर विशेष समित्या यांच्या सभापती पदांसाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/नवि-३२(४) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०.

**(७) अंतिम अधिसूचना क्रमांक २० :** मुंबई प्रांतिक महानगर पालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/ नवि-३२ (५) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०.

**(८) अंतिम अधिसूचना क्रमांक २१ :** नागपूर शहर महानगरपालिका (स्थायी समिती, प्रभाग समित्या, विशेष समंत्रक समित्या यांच्या सभापतीची निवडणूक घेणे) (सुधारणा), नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी २००९/९४/प्र.क्र.५९/नवि-३२(६), दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०.

**उद्देश :**

उक्त आठ अधिसूचनांमागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

'मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महानगरपालिकांच्या निवडणुका घेणे) (अनुसूची 'घ' ची सुधारणा) नियम, २००२ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या अनुसूची 'घ' मध्ये सुधारणा करण्यात आली असून, त्या नियमांच्या नियम ९(४) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये 'कोणत्याही मतदाराला प्रस्तावक किंवा यथास्थिती अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रावर स्वाक्षरी करता येणार नाही. जर एखादा मतदार प्रस्तावक म्हणून किंवा यथास्थिती, अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रांवर स्वाक्षरी करील तर निवडणुक निर्णय अधिकाऱ्याला मिळालेले पहिले नामनिर्देशन पत्र वगळता, अशी सर्व नामनिर्देशन पत्रे अवैध मानण्यात येतील आणि निर्वाचन अधिकाऱ्याकडून ती नाकारली जाण्यास पात्र असतील' अशी तरतूद करण्यात आली आहे. मात्र, महानगरपालिकेचे महापौर व उपमहापौर, स्थायी समितीचे सभापती व नगर परिषदेचे अध्यक्ष/उपाध्यक्षांच्या निवडणुक नियमात फक्त 'कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशने सूचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही' अशी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु, अशा प्रकारे पालिका सदस्य एकापेक्षा अधिक नामनिर्देशने सूचित करेल किंवा त्यास अनुमोदन देईल अशा परिस्थितीत कोणती कार्यवाही करावी, याबाबत नियमात तरतूद करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे, एका सदस्याने एकापेक्षा अधिक उमेदवारांचे सूचक किंवा अनुमोदन केल्यास अशा सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे नाकारली जाण्याची शक्यता होती. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या अनुसूची 'घ' मधील नियमांच्या नियम ९(४) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये केलेल्या तरतुदीनुसार 'जर एखाद्या पालिका सदस्याने एकापेक्षा अधिक उमेदवाराचे नामनिर्देशन सूचित करणाऱ्या किंवा त्यास अनुमोदन देणाऱ्या पत्रावर स्वाक्षरी केल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मिळालेले पहिले नामनिर्देशन पत्र वगळता इतर सर्व नामनिर्देशन पत्रे अवैध मानण्यात येतील व निर्वाचन अधिकाऱ्यांकडून ती नाकारली जाण्यास पात्र असतील.' अशी तरतूद पुढील ८ नियमांद्वारे करण्यात आलेली आहे :—

(१) मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) (सुधारणा) नियम, २०१०.

(२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) (सुधारणा) नियम, २०१०.

(३) नागपूर शहर महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) (सुधारणा) नियम, २०१०.

(४) मुंबई महानगरपालिका (स्थायी समिती, सुधारणा समिती, बृन्हमुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती, शिक्षण समिती, प्रभाग समित्या आणि इतर विशेष समित्या यांच्या सभापती पदांसाठी निवडणुका घेणे) (सुधारणा) नियम, २०१०.

(५) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१०.

(६) नागपूर शहर महानगरपालिका (स्थायी समिती, प्रभाग समित्या, विशेष समंत्रक समित्या यांच्या सभापतीची निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१०.

(७) महाराष्ट्र नगर परिषदा आणि नगर पंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) (दुसरी सुधारणा) नियम, २०१०.

(८) महाराष्ट्र नगर परिषद (उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१०.

२. उपरोक्त नियम करण्याची तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ याचे कलम २९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याचे कलम ४५६अ चे पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) चे परंतुक, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम ४२० चे पोट-कलम (१) तसेच महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १७, कलम ५१ व कलम ३२१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन नियमांच्या पूर्व प्रसिध्दीची शर्त काढून नियम अधिसूचित करण्यात आले आहेत. सदरहू नियम अधिसूचित करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाशी सल्ला मसलत करण्यात आली आहे'.

नागपूर शहर महानगरपालिका (स्थायी समिती, प्रभाग समित्या, विशेष समंत्रक समित्या यांच्या सभापतीची निवडणूक घेणे) (सुधारणा), नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी २००९/९४/प्र.क्र.५९/नवि-३२(६), दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१० रोजीची उक्त अधिसूचना दिनांक २ जून,२०११ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली असता **समितीने त्यासंदर्भात 'जर एखाद्या पालिका सदस्याने एकापेक्षा अधिक उमेद्वाराचे नामनिर्देशन सूचित करणाऱ्या किंवा त्यास अनुमोदन देणाऱ्या पत्रावर स्वाक्षरी केली तर अशा पालिका सदस्याचा मतदानाचा अधिकार रद्द करण्यात यावा'**, या मुद्दयाच्या अनुषंगाने नगरविकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

समितीने उक्त अधिसूचनेच्या संदर्भात सचिव, नगर विकास विभाग यांची साक्ष दिनांक १५ जून,२०११ रोजी घेतली :—

सदरहू साक्षीच्या वेळी समितीने असे मत व्यक्त केले की, 'मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन मुंबई महानगरपालिका ( महापौर आणि उप महापौर या पदासाठी निवडणुका घेणे ) ( सुधारणा ) नियम, २००७ च्या नियम ६ च्या

पोट-नियम (२)मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या परंतुकान्वये करण्यात आलेल्या तरतुदी मोघम स्वरुपाच्या आहेत. जर एकाच सदस्याने नामनिर्देशन पत्रावर एका वेळी विविध लोकांना पुरस्कृत केले तर त्या महानगरपालिकेत बहुसंख्येने असलेल्या पक्षाचा जो उमेदवार जाहीर झालेला असेल त्याच्याऐवजी दुसऱ्या उमेदवाराचे नामनिर्देशन सूचित करणारे किंवा त्यास अनुमोदन देणारे नामनिर्देशन पत्र प्रथम सादर करण्यात आले तर विद्यमान सुधारणेन्वये ते स्वीकार्य राहील व त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल. तसेच एखाद्या पालिका सदस्याने एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रावर सूचक किंवा अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली तर अशा पालिका सदस्याचा अधिकार रद्द करण्यात यावा.'

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, 'महानगरपालिका व नगरपालिकांच्या निवडणुकीच्या संदर्भात काही तरतुदी अधिनियमामध्ये विषद केलेल्या आहेत. या तरतुदी सर्व उमेदवारांसाठी सारख्याच आहेत. त्यामुळे एखादा पक्ष बहुमतात आहे, त्यामुळे या पक्षाच्या उमेदवाराला सवलती देणाऱ्या तरतुदी अधिनियमामध्ये केलेल्या आहेत, असे होत नाही. नियम तयार करताना कोणत्याही पक्षाला झुकते माप दिले जात नाही. एखाद्या सदस्याने सूचक किंवा अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक फॉर्मवर सही केलेली असेल तर जो फॉर्म प्रथम निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल, तो अर्ज ग्राहय धरण्यात येईल. बहुमतातील पक्षाचा उमेदवार किंवा स्वतंत्र उमेदवार यापैकी कोणत्याही उमेदवारास एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रे सादर करता येतील. त्यांनी केवळ एकच नामांकन पत्र सादर केले पाहिजे अशी अट घातलेली नाही. त्यामुळे त्यांना एकापेक्षा अधिक नामांकन पत्रे देखील सादर करता येतात. एका नामनिर्देशन पत्रावर सारखीच स्वाक्षरी असेल तर त्या उमेदवाराच्या दुसऱ्या फॉर्मवरील स्वाक्षरी विचारात घेतली जाईल. यामुळे त्या उमेदवाराचा अर्ज बाद ठरणार नाही. मात्र एकच फॉर्म असेल व त्यावरील स्वाक्षऱ्या सारख्या असतील तर मात्र तो उमेदवार बाद ठरविला जाईल.'

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की,'एकापेक्षा अधिक फॉर्मवर सदस्यास सही करता येत नाही. तसेच साधारणपणे सूचक व अनुमोदक एकच असावा.' त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, 'उमेदवाराने सादर केलेल्या फॉर्म्सपैकी एक फॉर्म जरी वैध असेल तरी देखील तो उमेदवार निवडणुकीस पात्र ठरतो.'

विभागाला ही तरतूद का करावीशी वाटते, याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, 'ही संकल्पना अधिनियमामध्ये स्पष्ट केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महानगरपालिकांच्या निवडणुका घेणे ) ( अनुसूची 'घ' ची सुधारणा) नियम, २००२ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ मधील अनुसूची 'घ' मध्ये सुधारणा करण्यात आली असून, त्यातील नियम ९(४) च्या दुसऱ्या परंतुकान्वये " कोणत्याही मतदाराला प्रस्तावक किंवा यथास्थिती अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करता येणार नाही. जर एखादा मतदार प्रस्तावक म्हणून किंवा यथास्थिती अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रांवर स्वाक्षरी करील तर

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मिळालेले पहिले नामनिर्देशन पत्र वगळता अशी सर्व नामनिर्देशन पत्रे अवैध मानण्यात येतील आणि निर्वाचन अधिकाऱ्यांकडून ती नाकारली जाण्यास पात्र असतील " अशी तरतूद करण्यात आली आहे. मात्र महानगरपालिकेचे महापौर व उपमहापौर, स्थायी समितीचे सभापती व नगर परिषदेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष यांच्या निवडणूक नियमात फक्त ' कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशने सूचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही 'अशी तरतूद करण्यात आली आहे. परंतु, अशा प्रकारे पालिका सदस्य एकापेक्षा अधिक नामनिर्देशने सूचित करेल किंवा त्यास अनुमोदन देईल, अशा परिस्थितीत कोणती कार्यवाही करावी याबाबत नियमात तरतूद करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे नियम ९(४) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये केलेल्या तरतुदीनुसार 'जर एखाद्या पालिका सदस्याने एकापेक्षा अधिक उमेदवाराचे नामनिर्देशन सूचित करणाऱ्या किंवा त्यास अनुमोदन देणाऱ्या पत्रावर स्वाक्षरी केल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मिळालेले पहिले नामनिर्देशन पत्र वगळता इतर सर्व नामनिर्देशन पत्रे अवैध मानण्यात येतील व निर्वाचन अधिकाऱ्यांकडून ती नाकारली जाण्यास पात्र असतील ' अशी तरतूद करण्यात आलेली आहे. गेल्या ९ वर्षापासून नगर सेवकांची निवडणूक होताना ही तरतूद लागू आहे. कोणताही सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांना सूचक किंवा प्रस्तावक म्हणून स्वाक्षरी केल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास मिळालेला पहिलाच अर्ज ग्राहय धरला जाईल. त्यानंतरचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. सदस्याला अनर्ह करण्याचा अधिकार पक्षाला आहे, पक्षाचा आदेश पाळला नाही तर तो पक्ष सदस्याला अनर्ह करु शकतो, अशा परिस्थितीत एकापेक्षा जास्त पत्रांवर स्वक्षऱ्या करणाऱ्या मतदारला अनर्ह करण्यासंदर्भात तरतूद करण्यासंबंधी विभागाचे काय अभिप्राय आहेत या समितीच्या विचारणेवर विभागीय सचिवांनी सांगितले की, 'उमेदवार ज्या पक्षाचा आहे, त्याच पक्षाचे अनुमोदक व सूचक असतील तर अशा परिस्थितीत त्यांनी इतर दुसऱ्या पक्षाच्या उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रावर सही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कारण सर्वसाधारणपणे पक्षाची शिस्त पाळणे महत्वाचे असते. यामुळे पक्षाच्या उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रावर सही करता येईल व नामनिर्देशन पत्रामध्ये विवाद होणार नाहीत. एकापेक्षा जास्त नामनिर्देशन पत्रे सादर करण्याची तरतूद केलेली आहे. उमेदवाराने सादर केलेल्या दुसऱ्या नामनिर्देशन पत्रामध्ये अन्य प्रस्तावक किंवा सूचक असतील तर त्यामुळे कोणतीही बाधा येणार नाही.'

शासनाने यासंदर्भात जे नियम केलेले आहेत. यासंदर्भात एखाद्या सदस्याने, नगरसेवकाने डबल फॉर्मवर सूचक किंवा अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली तर संबंधितांना अपात्र करावे किंवा त्याचा मतदानाचा अधिकार रद्द करण्यात यावा अशी समितीची सूचना आहे असे अभिप्राय समितीने व्यक्त केले असता त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, 'यासंदर्भात अधिनियमामध्ये बदल करावा लागणार असून ही बाब मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करावी लागेल. Grounds of Disqualification मध्ये सूचना समाविष्ट करावी लागेल. यासाठी नियम नव्हे तर अधिनियम करावा लागेल. शासनाने ही सूचना मान्य केली तर सभागृहापुढे अशा प्रकारचे विधेयक आणता येईल.'

समितीने असेही मत व्यक्त केले की, दोन्ही फॉर्मवर सूचक व अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केल्यामुळे पहिल्यांदा अर्ज कोण सादर करतो यासाठी स्पर्धा लागेल. जो अर्ज पहिला पोहोचेल तोच आपण ग्राहय धरणार आहोत व जो अर्ज उशीर होईल तो अर्ज ग्राहय धरला जाणार नाही. जो पक्ष बहुमतामध्ये आहे अशा पक्षाचा फॉर्म उशीर झाला तर तो कॅन्सल होऊ शकतो. यामध्ये ब-याच वेळा आर्थिक लाभ घेऊन काम केले जाण्याचीही शक्यता निर्माण होते. त्यामुळे अशा प्रवृत्तीला प्रतिबंध घालण्याची नितांत आवश्यकता आहे. एकाच वेळी दोन व्यक्तींच्या फॉर्मवर सही केली असेल तर त्याचे डिसक्वालीफिकेशन झाले पाहिजे त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, आपली जी डिसक्वालीफिकेशनची सूचना आहे तिला नियमामध्ये घालता येणार नाही. तर त्यासाठी अधिनियम करावा लागेल. डिसक्वालीफिकेशनच्या संदर्भात अधिनियमात बदल करावा लागेल. त्यामुळे ही बाब आम्ही शासनापुढे सादर करु. सद्य:स्थितीत प्रत्येक उमेदवाराला एकापेक्षा अधिक फॉर्म भरता येतात. दोन फॉर्मवर जर एकाच सूचक व अनुमोदकाची सही असेल तर जो फॉर्म पहिला येईल तो स्वीकारला जाईल.

उपरोक्त आठही अधिसूचनासंदर्भात झालेल्या सविस्तर चर्चेच्या अनुषंगाने **'एखाद्या पालिका सदस्याने एकापेक्षा अधिक उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रावर सूचक किंवा अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली तर अशा पालिका सदस्याचा मतदानाचा अधिकार रद्द करण्याबाबत संबंधित अधिनियमात तरतूद करण्यात यावी,'** अशी शिफारस समितीने उक्त प्रत्येक अधिसूचनेला केली आहे.

## नगरविकास विभाग

**अंतिम अधिसूचना क्रमांक ५९ : महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, २००९ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक-टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र.१९३/२००६/नवि-११, दिनांकित १४ डिसेंबर, २००९**

**उद्देश :**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

'महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संवर्धन अधिनियम,१९७५ हा आठ प्रकरणात विभागला गेला आहे. त्यात एकूण २२ कलमे आहेत. यामधील कलम २२(१) अन्वये, राज्य शासनास नियम करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. मात्र अशी नियमावली अद्यापपर्यंत तयार करण्यात आलेली नव्हती. दरम्यानच्या काळामध्ये न्यायालयात सदरहू नियमावली तयार करण्यासाठी जनहित याचिका दाखल झाल्या असून शासनातर्फे नियमावली आगामी हिवाळी महाराष्ट्र विधानमंडळ अधिवेशनाचे वेळी दोन्ही सभागृहामध्ये ठेवण्यात येईल असे शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र विधानमंडळ अधिवेशनाच्या वेळी दोन्ही सभागृहामध्ये नियमावली ठेवण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम,१९७५ अंमलात असूनही वृक्ष तोडीमुळे मोठया प्रमाणावर होणारा वृक्षसंहार आणि लोकसंख्येमध्ये झालेली प्रचंड वाढ व त्याचबरोबर, वाहनांच्या संख्येतील वाढ यांमुळे पर्यावरण आणि राष्ट्रीय स्त्रोतांचे कधीही भरुन न येणारे अपरिमित नुकसान होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे तसेच विभिन्न वृक्ष प्राधिकरणांच्या कामकाजात सुसूत्रता आणणे हा मुख्य उद्देश सदरहू नियमावली तयार करण्यामागे आहे, जेणेकरुन अस्तित्वात असलेल्या वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबतचे आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची वृक्षसंपदा वृध्दींगत करण्याचे सर्वाधिकार सर्व संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींना राहतील.

शासनाने सदरहू प्रारुप नियमावली मान्य करुन त्याच्या प्रसिध्दीकरणाबाबत दिनांक १७ जुलै,२००८ रोजी सूचना काढलेली आहे व ही सूचना दिनांक ३१ जुलै, २००८ रोजीच्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

या सूचनेद्वारे प्रारुप नियमावली सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगर पंचायती व संचालक, नगररचना ह्यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यात आली होती व त्यावरील सूचना/हरकती संचालक, नगररचना (महाराष्ट्र राज्य), पुणे ह्यांचेकडे ६० (साठ) दिवसांचे आत देण्याबाबत कळविले होते.

संचालक, नगररचना, (महाराष्ट्र राज्य), पुणे यांच्याकडे विहित मुदतीत एक, विहित मुदतीनंतर एक तसेच शासनाकडे एक अशा एकूण तीन हरकती/सूचना प्राप्त झाल्या आहेत. या सूचना व हरकती विचारात घेऊन अंतिम नियमावली दिनांक १४ डिसेंबर,२००९ च्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रसिध्द करणेत आलेल्या नियमावलीतील ठळक वैशिष्ठये खालीलप्रमाणे आहेत :–

(१) वृक्ष प्राधिकरणाची रचना आणि कार्यपध्दती.

(२) वृक्ष प्राधिकरणाच्या अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधीच्या नियुक्तीबाबत निकष.

(३) वृक्ष गणना व अर्ज, हमीपत्र इत्यादीची प्रारुपे.

(४) रस्त्यालगत व विभिन्न वापर विभाग व सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपणासाठी किमान संख्येची मानके.

(५) वृक्षतोडीसाठी करावयाच्या अर्जाचे प्रारुप.

(६) वृक्ष प्राधिकरणाने दिलेल्या परवानगीच्या तपशीलाचे प्रारुप.

(७) अर्जदाराने द्यावयाच्या पूर्तता अहवालाचे प्रारुप'

उपरोक्त अधिसूचना दिनांक १७ ऑगस्ट,२०१० रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवली असता, समितीच्या असे निदर्शनास आले को, 'महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ हा सन १९७५ मध्ये संमत होऊन सुध्दा त्यासंबंधीचे नियम मात्र दिनांक १४ डिसेंबर,२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत. सर्वसाधारणपणे अधिनियम शासन राजपत्रात प्रकाशित झाल्यानंतर त्याबाबत लवकरात लवकर नियम होणे आवश्यक असताना उक्त नियम तयार करण्यासाठी ३४ वर्षांचा कालावधी का लागला' याबाबत समितीने नगरविकास विभागाकडून माहिती मागवली व त्याअनुषंगाने प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची दिनांक २५ ऑगस्ट, २०१० रोजी साक्ष घेतली. (समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने विभागाने सादर केलेली माहिती परिशिष्ट 'अ' मध्ये सादर करण्यात आली आहे.)

सदरहू साक्षीच्या वेळी समितीने उक्त मुद्यांच्या संदर्भात सदरहू नियम दिनांक १४ डिसेंबर, २००९ रोजी प्रसिध्द केले आहेत यास एवढा विलंब का झाला असे विचारले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, हा अधिनियम १९७५ चा आहे. सन १९९५ पर्यंत या अधिनियमाची अंमलबजावणी कोणी गंभीरपणे घेतली नाही. सन १९९६ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानंतर या अधिनियमांतर्गत नियम करण्याची महानगरपालिकेला गरज भासली. विशेषतः मुंबई महानगरपालिकेला, मुंबई महानगरपालिकेने नियम करायला पाहिजे, असे शासनाला पत्र पाठविले. त्यामुळे नगरविकास विभागाने संचालक, नगररचना, पुणे यांना पत्र पाठवून त्यांच्याकडून नियमावली तयार करण्यासाठी सन २००१ मध्ये अहवाल मागविला. संचालकांनी दिनांक २४ सप्टेंबर,२००१ रोजी यासंबंधी नियमावली करण्याची गरज नाही, नियम करणे शासनावर बंधनकारक नाही, असा अभिप्राय दिला. शासनाने फक्त आदेश पारित करावा व तो सर्व महानगरपालिका, नगरपालिका यांना बंधनकारक राहील, असे म्हटले आहे. तथापि, शासनाला असे वाटले की, यासंबंधी नियमावली करणे गरजेचे आहे. वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन कसे केले पाहिजे अशा संबंधी नियम केले पाहिजेत. महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५

अंतर्गत नियम करण्यात आले आहेत. वृक्षारोपण किती जागेत करावे, वृक्ष तोड कशी करावी, वृक्ष कुठल्या जागेत लावावे, वृक्षाची गणना कशी केली पाहिजे, त्यासाठी आवश्यक असणारे अर्ज या नियमावलीमध्ये समाविष्ट आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यावर समितीने संचालक, नगर रचना यांना गरज वाटली नाही, पण शासनाला नियमावलीची गरज ३४ वर्षानंतर का वाटली आहे ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका यांच्यामध्ये एकवाक्यता नव्हती. प्रत्येक महानगरपालिकेमध्ये वेगवेगळी पध्दत होती. त्यामुळे कोणत्या प्रकारची झाडे लावली पाहिजेत त्यासाठी काय निकष असावेत, कशा पध्दतीने अर्ज करायला पाहिजे, वृक्ष छाटणी करायची असेल तर वृक्ष प्राधिकरणाला अर्ज कसा करावयाचा यासंबंधीचा अर्ज नियमामध्ये समाविष्ट केलेला आहे. यामध्ये एकरुपता असली पहिजे असे शासनाला वाटल्यामुळे नियमामध्ये अर्जाचा समावेश करण्यात आला आहे. मुंबई महानगरपालिकेने सन २००१ मध्ये त्याबाबत कळविले होते. त्यामुळे शासनाला नियम करण्याची गरज आहे असे वाटल्यामुळे तत्संबंधातील विस्तृत अहवाल शासनाने मागविला. यासंबंधी सामाजिक वनीकरण, ग्रामविकास जलसंधारण विभाग यांचा अभिप्राय तसेच तज्ञांचा व विधी व न्याय विभागाचा सल्ला घेऊन हरकत मागवून मसुदा ठेवण्यात आला. सदर नियमावली बनविण्यास खूप विलंब झालेला आहे हे मान्य करीत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अधिनियमाची अंमलबजावणी करीत असताना ज्या काही अडचणी येतील त्या सुकर करण्यासाठी विधानमंडळाने शासनाला नियम बनविण्यासाठी अधिकार दिलेले आहेत. ३४ वर्षे नियम केले नसतील तर मग कायद्याची अंमलबजावणी कितपत झाली असेल ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नियम नसले तरी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सर्वकष समावेश करण्यात आला आहे.

मूळ अधिनियम हा १९७५ चा आहे. दिनांक १४ डिसेंबर, २००९ रोजी प्रारुप करुन दिला. सन २००१ मध्ये संचालकांनी नियम करण्याची गरज आहे असे अभिप्राय दिले. विभागाने सुचविलेल्या फॉर्मपेक्षा वेगळा फॉर्म सुचविणे हे संचालकांच्या पातळीवर योग्य आहे काय? यासंदर्भात विभागीय पातळीवर काय निर्णय झाला याची माहिती देण्यात यावी असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, संचालकांचा अहवाल शासनाकडे आला. त्यावर शासनाने वृक्ष नियम तयार केले पाहिजेत असा निर्णय घेतला. त्यानंतर दिनांक ९ मे,२००२ रोजी वृक्ष नियमावली तयार करण्यात यावी आणि ती तयार करताना तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेऊन तयार करण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना संचालकांना देण्यात आल्या. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक ९ जुलै,२००४ रोजी यासंबंधीचे प्रारुप सादर केले. हे प्रारुप विभागाकडे आल्यानंतर, विभागास असे वाटले की, ते अपूर्ण आहे. त्यामध्ये आणखी निकष असण्याची गरज आहे. उदाहरणार्थ दोन झाडांमध्ये किती अंतर असावे, एका हेक्टरमध्ये किती झाडे लावावीत यासंबंधीची आणखी

माहिती घेणे आवश्यक आहे. म्हणून ती माहिती घेण्यासाठी दिनांक ९ ऑगस्ट, २००६ रोजी सामाजिक वनीकरण विभागाकडे तसेच ग्राम विकास विभागाकडे पत्र पाठविण्यात आले. या दोन्ही विभागांनी दोन वर्षानंतर माहिती पाठविली. ती माहिती विभागाकडे आल्यानंतर लगेच विधानसभेपुढे ठेवली. नियमावली विधानसभेपुढे ठेवण्यास उशीर झालेला आहे हे, मान्य करतो. कदाचित हे सांगणे बरोबर होणार नाही की, सन १९७५ मध्ये अधिनियम झाल्यानंतर एवढा उशीर का झाला. पण त्याला पाहिजे तेवढे महत्व विभागीय स्तरावर दिले गेले नाही असे याठिकाणी दुर्दैवाने सांगावे लागत आहे. बैठकीला येण्यापूर्वीच नागरी क्षेत्रात वृक्षांचे प्रमाण वाढले आहे की कमी झाले आहे यासंबंधीची माहिती घेतली असता यासंदर्भात जे स्टॅटिस्टिक्स प्राप्त झालेले आहे त्यावरुन वृक्षांचे प्रमाण वाढलेले आहे. या अधिनियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी चालू आहे. सर्व महानगरपालिकांमध्ये 'ट्री ॲथॉरिटी'च्या बैठका महिन्याला होत आहेत. तसेच याबाबतची अंमलबजावणी सर्व महानगरपालिकांमध्ये चालू आहे.

त्यावर समितीने विचारणा केली की, ऑर्डर्स ऑफ द गव्हर्नमेंट व डेलिगेटेड फॉर्म यामध्ये कायद्याच्या दृष्टीने फरक आहे. सन १९७५ मध्ये तयार झालेल्या इतक्या महत्वाच्या कायद्याच्या बाबतीत शासनाच्या स्तरावर इतका विलंब लावला जात आहे. अशा प्रकारच्या नियमांची आवश्यकता आहे याची विभागाने गांभीर्याने नोंद घेतली नाही. तसेच 'डेलिगेटेड फॉर्म' शासनाच्या स्तरावर वापरला नाही तर त्यासंबंधीच्या कृतींमध्ये एकसूत्रता रहात नाही हे खरे आहे काय? शासनाने प्रॉपर नियम तयार न केल्यामुळे एकसूत्रता राहिली नाही ही गोष्ट खरी आहे काय?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, नियमावली तयार होण्यापूर्वी प्रत्येक महानगरपालिका आपापले नियम आपापल्या स्तरावर तयार करुन त्याची अंमलबजावणी करीत होती त्यामुळे त्यांच्यामध्ये एकसूत्रता राहिली नव्हती. नागपूर आणि मुंबई महानगरपालिका यांचे फॉर्म्स आणि बैठक घेण्याची पध्दत यामध्ये तफावत होती. नियमामध्ये अशी तरतूद आहे की, दर महिन्याला बैठक व्हावयास पाहिजे. काही महानगरपालिकांमध्ये तीन-चार महिन्यानंतर बैठक होतात. पुण्यासारख्या महानगरपालिकेमध्ये दर महिन्याला बैठक होतात. याबाबतीत सर्व महानगरपालिकांमध्ये एकसूत्रता राहणे गरजेचे आहे यादृष्टीकोनातून ही नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

त्यावर समितीने विचारणा केली की, डेलिगेटेड फॉर्म वापरले असते तर विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाला आणि या समितीला त्याबाबतीत जे अधिकार वापरता येणार होते त्यापासून दोन्ही सभागृहांना आणि या समितीला इतक्या दीर्घकाळपर्यंत वंचित करण्यात आले. डेलिगेटेड लेजिस्लेटिव्ह फॉर्म वेगवेगळ्या पध्दतीने वेगवेगळ्या प्रकारे वापरणे ही गोष्ट कायदा आणि नियम या दृष्टीने उचित आहे काय? 'डेलिगेटेड लेजिस्लेटिव्ह ॲप्रॉप्रियट फॉर्म' वापरले असते तर त्याबाबतीत सभागृहाला आणि या समितीला जे अधिकार आहेत ते वापरता आले असते. पण 'डेलिगेटेड फॉर्म' बायपास झाल्यामुळे प्रदीर्घ काळपर्यंत इतर फॉर्म्सचा वापर करुन काम भागविले असल्यामुळे दोन्ही सभागृहाच्या दृष्टीने आणि समितीच्या दृष्टीने अत्यंत अयोग्य झाले आहे. याबाबतीत विभागाचे काय मत आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, मूळामध्ये सन १९७५ मध्ये अधिनियम तयार करीत असताना "May" हा शब्द वापरला आहे तो चुकीचा आहे. त्यावर प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी सांगितले की, रुल्स तयार करताना नेहमी "may" हा शब्द वापरला जातो "shall" हा शब्द वापरला जात नाही. The word, "May" is obligatory असे असले तरी विभागांनी अधिनियमांतर्गत नियम तयार करणे हे अभिप्रेतच असते.

या अधिनिमामध्ये जे उद्देश व कारणे दिलेली आहेत, त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी शासनाला नियम तयार करण्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु मूळ प्रश्न तसाच राहिला आहे. येथे वृक्ष प्राधिकरण केवळ नेमलेले आहे. त्यांच्या बैठका कधी घ्याव्या, महानगरपालिकांनी वार्षिक किती झाडे लावावीत हे दिलेले आहे. गेल्या ३८ वर्षात कोणी काम केलेले आहे ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वृक्ष प्राधिकरणाची तरतूद मूळ कायद्यामध्ये आहे. हे वृक्ष प्राधिकरण सन १९७५ पासून अस्तित्वात आलेले आहे. या वृक्ष प्राधिकरणाच्या रेग्युलर बैठका होत नव्हत्या याचे मुख्य कारण या वृक्ष प्राधिकरणाचे चेअरमन कोण असावे याची तरतूद केलेली नव्हती. सन १९९६ ला या मूळ कायद्यात दुरुस्ती करण्यात आली आणि या प्राधिकरणाचे चेअरमन महानगरपालिकेचे आयुक्त असतील अशी तरतूद करण्यात आली. त्यानंतर यामध्ये सुसूत्रपणा आला. त्यानंतर या वृक्ष प्राधिकरणाची महिन्यातून एकदा बैठक होत आहे.

एका वृक्षाची तोडणी केल्यानंतर किती वृक्ष लावावीत, याचे प्रपोर्शनेट ठरवून, त्याचा नियमामध्ये समावेश करावा. त्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन नियमात दुरुस्ती करण्यासाठी प्रयत्न करणार आहात काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत विभागाकडून जरुर प्रयत्न केला जाईल. तसेच वृक्ष लावण्यासंबंधी काही निकष आहेत त्यानुसार रस्त्याच्या बाजूने बागा, समुद्र किनारे, टेकडी उतार, हरितक्षेत्रे, हरितपट्टे, नदी किनारे, पाणथळे जागांचे किनारे असल्यास तेथील रस्त्याची रुंदी २४ मीटर आणि अधिक असल्यास प्रति १० मीटर अंतरावर एक वृक्ष व ( मेडीयनच्या दोन्ही बाजूला सोईनुसार हेजेस ) लावला पाहिजे. तसेच केंद्र शासन / राज्य शासन /निमशासकीय / कॉर्पोरेट कार्यालये /संस्थीय इत्यादी ठिकाणी असलेल्या रस्त्यांच्या बाजूने भूखंडाच्या प्रति १०० चौरस मीटरच्या क्षेत्रासाठी एक वृक्ष लावला पाहिजे.

समितीने असा मुद्दा उपस्थित केला की, सार्वजनिक बाबींच्या संदर्भात रस्त्यांची कामे करीत असताना त्यात येणाऱ्या वृक्षांची तोड करावी लागते. त्याबाबत निश्चित स्वरुपाचा नियम आहे काय ? नसल्यास ही बाब नियमावलीत प्रस्तावित करुन त्याप्रमाणे नियमावली तयार करणार आहात काय ? तसेच कॉम्पेनसेटरी फॉरेस्टेशनसंबंधी कशा प्रकारे कार्यवाही करावी याबाबत स्पेसिफिक नियम आहेत काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात अनुसूची-एक मध्ये माहिती दिलेली आहे.

समितीला विभागाच्या सचिवांनी अनुसूची-एकचा संदर्भ दिला आहे. उदाहरण म्हणून सांगायचे झाल्यास रस्त्याच्या कामाच्या संदर्भात दोन वृक्षांची तोड करायची असल्यास त्यासंबंधी नेमकी कोणती कार्यवाही करायची यासंबंधी नियम असल्यास जास्त संयुक्तिक होऊ शकेल, या समितीच्या विचारणेवर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या संदर्भात महानगरपालिकेचे आयुक्त हे स्वतः प्रमुख आहेत. तसेच रस्ते तयार करीत असताना त्यात येणा-या वृक्षांच्या संदर्भात ट्री ॲथॉरिटीने वृक्ष तोडीच्या संदर्भात अनुमती दिलेली नाही, अशी बाब कधीही निदर्शनास आली नाही. मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात पाण्याची पाईपलाईन असो, रस्ते किंवा सिवरेज असो पाईपलाईन टाकायची असल्यास, तेथे वृक्षांचा प्रश्न निर्माण झाल्यास, त्यासंबंधी ट्री ॲथॉरिटी कडून कार्यवाही झालेली नाही, असे कधी झाले नाही. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर तिवरांचे वृक्ष आहेत. त्यामुळे मेट्रो तसेच मोनो रेलचे प्रोजेक्ट रखडलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. कुठल्याही प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर असो, त्यासंबंधी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी लागते.

शहराचा विकास करीत असताना, रस्ते किंवा प्रकल्प असो तेथे वृक्षांचा प्रश्न निर्माण होत असल्यास, त्याबाबत काटेकोटरपणे कडक अंमलबजावणी करता यावी अशाप्रकारे रुल्समध्ये युनिफॉर्मली प्रिस्क्राईब करण्यासाठी काही अडचण आहे काय ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात महानगरपालिका आयुक्त हे स्वतः प्रमुख आहेत. साधारणपणे इन्फ्रास्ट्रक्चरला फायदा होईल, अशाप्रकारचा प्राधिकरणाकडून निर्णय घेतला जात नाही व त्यांनी अशाप्रकारचा निर्णय घेऊ नये, अशी अपेक्षा असते. त्यामुळे या संदर्भात त्यांच्यावर अशाप्रकारची बाब बंधनकारक करणे कितपत योग्य होऊ शकेल, ही बाब महत्वाची आहे. वृक्षांचे रक्षण करणे, त्यांचे संवर्धन करणे हा वृक्ष प्राधिकरणाचा मुख्य उद्देश आहे. परंतु वृक्षतोड करण्यासाठी रस्ते घ्यावयाचे, ही बाब संयुक्तिक होणार नाही. त्यामुळे प्राधिकरणाचे अधिकार अबाधित राहिले पाहिजेत. परंतु एखादे प्राधिकरण सार्वजनिक हिताविरोधी कार्यवाही करीत असल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा शासनाला अधिकार आहे.

उक्त साक्षीदरम्यान समितीने आणखी काही मुद्दयांवर विभागाकडून माहिती मागविण्यात आली. (समितीने मागविलेली माहिती परिशिष्ट 'ब' मध्ये सादर करण्यात आली आहे.) सदरहू माहिती विभागाकडून प्राप्त झाली असता ती दिनांक २९ जून,२०११ रोजीच्या बैठकीत समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आली. समितीने त्यावर विचारविनिमय केला व या अंतिम अधिसूचनेसंदर्भात कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

अं. ५९

# परिशिष्ट ‘ अ ’

## महाराष्ट्र शासन

**क्रमांक:** टीपीबी ४३०६/२४३३/प्र.क्र.१९३/२००६/नवि-११
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २५ ऑगस्ट,२०१०.

प्रति,
अवर सचिव(समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
आवक क्रमांक: 34340
दिनांक: 25 अगस्त AUG 2010
वेळ: ........ स्वाक्षरी ........

**विषय: महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे ) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ वरील नियम प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र.१९३/नवि-११,दिनांक १४/१२/२००९**

**संदर्भ: आपले पत्र क्र.मविस/उपविधान/ड-११ दिनांक २० ऑगस्ट, २०१०**

संदर्भाधिन पत्रान्वये महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे ) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम १९७५ वरील नियम तयार करण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत समितीने केलेल्या विचारणेनुसार या विभागाकडील उपलब्ध अभिलेखानुसार खालीलप्रमाणे खुलासा सादर करणेत येत आहे.

महाराष्ट्र ( नागरी क्षेत्रे ) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम,१९७५ मध्ये जानेवारी १९९६ मध्ये सुधारणा केली असून, त्याची अंमलबजावणी दिनांक ८/१/१९९६ पासून करणेत आलेली आहे.

सदर अधिनियमात सुधारणा केल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांनी तत्कालीन सचिव, नगर विकास विभाग यांना नियम व नियमावली उपलब्ध करुन देणेची विनंती दिनांक २९ मार्च,१९९६ रोजीचे पत्रान्वये केली होती. त्यावर शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक १६/४/१९९६ रोजीचे पत्रान्वये नियम व नियमावली तयार करण्याचे काम नगर विकास विभागाकडे सुरु असल्याचे मुंबई महानगरपालिकेस कळविले होते.

त्यानंतर, महानगरपालिका आयुक्त यांनी दिनांक २९/८/२००१ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये प्रधान सचिव (नगर विकास ) यांना केलेल्या विनंतीनुसार या विभागाने संचालक, नगर रचना (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचा सविस्तर अहवाल दिनांक १०/९/२००१ रोजीचे पत्रान्वये मागविला होता. संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १८/९/२००१ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या नगर विकास विभागास अहवाल पाठविला आहे

त्यानुसार अधिनियमाखाली नियम न करता शासनाने आदेश काढणे योग्य ठरेल मात्र नियम करावयाचे ठरल्यास " वृक्षमित्र" संस्थेच्या संकल्पना विचारात घेणेसाठी सदर संस्थेस त्यांना अपेक्षित असलेल्या अधिनियमातील सुधारणांचे तसेच नियमांचे व विनियमांचे प्रारुप संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविणेबाबत कळविल्याचे संचालक, नगर रचना यांनी शासनास कळविले होते.

त्यानंतर, शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक ९ मे,२००२ रोजीचे पत्रान्वये संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे व उद्यान अधिक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पत्र पाठवून झाडांच्या जाती/घनता इत्यांदी विषयात तज्ञ असलेल्या व्यक्तीचे व संस्थांचे सहकार्य घेऊन, उक्त अधिनियमातील नियम व नियमावलीचे प्रारुप तयार करुन, शासनास तात्काळ पाठविण्याबाबत कळविले होते.

त्यानंतर संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी दिनांक ९/७/२००४ रोजीचे पत्रान्वये वृक्षसवंर्धन क्षेत्रातील काही अशासकीय संस्था, बृहन्मुंबई, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाचे अधिकारी यांच्या समवेत बैठका घेऊन, अधिनियमाचे कलम २२(१) मधील तरतूदीनुसर नियमावलीचे प्रारुप शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी/ मंजूरीसाठी सादर केले होते.

शासनाच्या नगर विकास विभागाने प्राप्त नियमावलीचे प्रारुपावर सामाजीक वनीकरण विभाग व विधी व न्याय विभागाचे अभिप्राय दिनांक ९/८/२००६ रोजी अनौचारीक संदर्भाद्वारे मागविले होते.

सामाजीक वनीकरण विभागाचे दिनांक २१/५/२००८ रोजीचे अनौ. संदर्भाद्वारे नागरी क्षेत्रे हे सामाजीक वनीकरण विभागाच्या अखत्यारीतील बाब नसल्याचे अभिप्राय या विभागास पाठविले होते.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी त्यांचे अभिप्राय दिनांक ९/६/२००८ रोजीचे पत्रान्वये नगर विकास विभागाकडे पाठविले होते.

नगर विकास विभागाने वरील विभागांचे अभिप्राय व संचालक, नगर रचना यांनी तयार केलेल्या नियमावलीचे अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे उप सचिव यांचे सल्ल्याने प्रारुप नियमावली शासकीय राजपत्रात हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करणे व त्यांच्या प्रती विधानमंडळ उपविधान समितीकडे पाठविणेसंबंधीच्या नगर विकास विभागाच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री महोदयाकडून दिनांक १/७/२००८ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे.

या मान्यतेनुसार शासनाच्या नगर विकास विभागाने प्रारुप नियम प्रसिध्दीकरणाची नोटीस दिनांक १७/७/२००८ रोजी काढलेली आहे व सदर नोटीस दिनांक ३१/७/२००८ रोजीच्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द करणेत आलेली आहे.सदर प्रसिध्दीकरणानुसार संचालक, नगर रचना,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे एकून तीन हरकती/ सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांचे अभिप्राय शासनाकडे सादर केले होते.

दरम्यान, श्री. मधुकर बचुलकर व इतर यांनी वृक्ष अधिनियम, १९७५ च्या कलम २२(२) अनुसार नियम तयार करुन, अंमलात आणलेले नसल्यामुळे, मा.उच्च न्यायालय,मुंबई (अपीलेट बाजू) येथे राज्य शासन व इतर यांचेविरुध्द जनहित याचिका क्र. ६४/२००९ दाखल केली होती. सदर जनहित याचिकेमध्ये शासन (न.वि.) यांचेतर्फे उपसंचालक, नगररचना,बृहन्मुंबई यांना प्राधिकृत करणेत आले होते. सदर याचिकेमध्ये दि.२९.४.२००९ व त्यानंतर दि.२१.८.२००९ रोजी शासनातर्फे प्रतिज्ञापत्र दाखल करणेत आले होते. त्यामध्ये, कलम २२(२) अनुसार तयार करण्यात आलेले नियम हे नोव्हेंबर डिसेंबर, २००९ चे महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे वेळी दोनही सभागृहांपुढे मानयतेसाठी ठेवणेत येतील असे मा. उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणले होते.

त्यानंतर, वरील नियम हे महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.१४.१२.२००९ रोजी प्रसिध्द करणेत आल्याचे व दि.२२.१२.२००९ रोजी दोन्ही सभागृहाचे पटलावर ठेवण्यात आल्याचे प्रतिज्ञापत्र दि.२७.१.२०१० रोजी दाखल केल्यानंतर मा.उच्च न्यायालयाने दि.२८.१.२०१० रोजी सदर जनहित याचिका क्र.६४/२००९ यामध्ये दि.२८.१.२०१० रोजी अंतिम निर्णय देवून, जनहित याचिका निकाली काढली आहे.

वृक्ष अधिनियम,१९७५ च्या कलम २२(२) अनुसार, सदर अधिनियमान्वये करण्यात आलेले नियम, हे महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ३० दिवसांचे कालावधीसाठी ठेवणे आवश्यक असल्याने, त्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांची मंजूरी दिनांक ५/८/२००९ रोजी प्राप्त करुन घेणेत आली होती. त्यानुसार सदर नियम हे डिंसेबर २००९ चे हिवाळी अधिवेशनात दिनांक २२/१२/२००९ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवणेबाबतची कार्यवाही पूर्ण करणेत आली असून सदर नियम दिनांक १४/१२/२००९ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आले आहेत.तसेच सदर नियम हे राज्यातील सर्व महानगरपालिका व नगर परिषदा इत्यादी ठिकाणी प्रसिध्द करणेबाबत दिनांक १०/२/२०१० रोजी कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी, सन-१९७५ ते सन- १९९६ या दरम्यान सदर नियम तयार करणेसाठी करणेत आलेल्या प्रयत्नाबाबतचा अभिलेख उपलब्ध नसल्याने त्यामागची कारणमिमांसा स्पष्ट होत नाही. तथापि सन-१९९६ पासून नगर विकास विभागाचे स्तरावरुन

आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबी विचारात घेवून, वृक्ष नियमावली अंमलात आणण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

( नो.र. शेंडे )
उप सचिव

अ.५८ महाराष्ट्र शासन परिशिष्ट 'ब' (५८)

**क्रमांकः** टिपीबी-४३११/२४३३/प्र.क्र. १८३/०६ /नवि-११
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ /०३/२०११.

प्रति,
**अवर सचिव (समिती),**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

**विषय - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ वरील प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचनेबाबत.**

**संदर्भ -** १) या कार्यासनाचे पत्र क्र. टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र.१९३/२००६, दिनांक -१८/१२/२००९
२) आपले पत्र क्र. ३४८०३/म.वि.स./ड-११, दिनांक - २०/८/२०१०
३) या कार्यासनाचे पत्र क्र. टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र.१९३/२००६,दिनांक २४/८/२०१०.
४) आपले पत्र क्र. ३५३९९/म.वि.स./ ड-११/ दिनांक -- २०/८/२०१०.
५) या कार्यासनाचे पत्र क्र. टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र.१९३/२००६, दिनांक - १६/१०/२०१०.
६) आपले पत्र क. १३४२६/मविस/उपविधान/ड-११/ दिनांक - १७/३/२०११ (प्राप्त दि. २४/३/२०११)

महोदय,

विषयांकित प्रकरणी आपलेकडील वरील संदर्भिय दि. १७/३/२००१ च्या पत्रान्वये दि.३०/८/२०१० पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबतची माहिती अपेक्षिलेली आहे. सदर प्रकरणी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहाय्यक संचालक, भाषा संचालनालय यांचे अहवाल प्राप्त झालेले आहेत. सदर अहवाल विचारात घेता दि.३०/८/२०१० च्या पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दा | माहिती |
|---|---|---|
| १ | नियम तयार करण्याकरीता झालेल्या विलंबामागील कारणमिमांसा काय आहे व बिलंबास कोण-कोणते अधिकारी जबाबदार आहेत ? | प्रस्तुत प्रकरणी अवर सचिव (समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचेकडील दि. २४/८/२०१० च्या पत्रान्वये खुलासा अपेक्षिला होता. त्याबाबत या कार्यासनाकडे पत्र क्र. |

| | | |
|---|---|---|
| | | टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र.१३/२००६/नवि-११, दि. २४/८/२०१० अन्वये अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये सदर प्रकरणी सन १९७५ ते १९९६ या दरम्यान सदर नियम तयार करण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांबाबतचा अभिलेख उपलब्ध नसल्याने त्यामागची कारणमिमांसा स्पष्ट होत नाही असे कळविलेले आहे. सन १९९६ पासून आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबी विचारात घेऊन वृक्ष नियमावली पूर्ण करण्यात आलेले आहे असे कळविलेले आहे. त्यामुळे बिलंबाबाबत निश्चित जबाबदार असणारे अधिकारी निश्चित करता येत नाहीत. |
| २ | सदरहु नियमावली येण्यापूर्वी दरम्यानच्या इतक्या वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीत राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा/नगरपंचायतींमध्ये या संदर्भात प्राधिकृत अधिकारी कोण होते? | सदरहू नियमावली येण्यापूर्वी महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे)वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ लागु असल्याने या अधिनियमातील नियम ३(१)व (२) मधील तरतुदींचे अवलोकनाअंती या कालावधीत राज्यातील महानगरपालिकांच्या बाबत, महानगरपालिकेचे आयुक्त तसेच नगरपरिषदांच्या बाबतीत नगरपरिषदांचे अध्यक्ष हे वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष असल्याचे दिसून येते. तसेच या अधिनियमातील नियम क्र. ५ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेसाठी सहाय्यक आयुक्त पदापेक्षा जास्त अर्हता/ दर्जा असणारे अधिकारी व नगरपरिषदांसाठी मुख्याधिकारी नगरपरिषद हे वृक्ष अधिकारी असावेत अशी स्पष्टता दिसून येते. |
| ३ | सदरहू नियमांमध्ये बऱ्याच ठिकाणी उदा. नियमांचे क्रमांक दर्शविताना अथवा काही शब्दांचा इंग्रजीत वापर केला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. सबब, त्याबाबतीत भाषा संचालनालयाच्या मार्गदर्शनाने त्या-त्या इंग्रजी शब्दांच्या जागी मराठी शब्दांचा वापर करुन शुध्दीपत्रक काढण्यात यावे, असे समितीचे मत आहे. | प्रस्तुत प्रकरणी सहाय्यक संचालक, भाषा संचालनालय यांचे कडून मराठी नियम पडताळून घेण्यात आलेले आहेत. त्यांचेकडील दि. २८/९/२०१० (प्राप्त २०/१०/२०१०) च्या पत्रान्वये मराठी मजकुरामध्ये तफावत असल्याचे कळविलेले आहे. सदर प्रकरणी विधी व न्याय विभागाचे सल्ल्याने शुध्दीपत्रक काढावे लागणार आहे. |
| ४ | सार्वजनिक हितास्तव एखादे झाड तोडावे लागत असल्यास त्याबाबत, नियमामध्ये अथवा अधिनियमामध्ये एकसमान धोरण (Uniform Prescription ) करता येईल का? | प्रस्तुत प्रकरणी राज्यामध्ये महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये भौगोलिक परिस्थितीमध्ये समानता नाही. त्यामुळे विविध क्षेत्रामध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार विविध प्रकारचे वृक्ष |

| | | |
|---|---|---|
| | | आढळून येतात. त्यामुळे त्या त्या भौगोलिक क्षेत्राप्रमाणे स्थानिक स्तरावर निर्णय होणे आवश्यक राहील. त्यामुळे समान धोरण अंमलात आणावयाचे झाल्यास त्यावर अभ्यास गट नेमून सांगोपांग विचार करावा लागेल. |
| ५ | महापालिकांच्या बाबतीत आयुक्तांना प्राधिकृत अधिकारी नेमण्यात आले आहे. तर नगरपालिकांच्या बाबतीत असे प्राधिकृत अधिकारी कोण राहतील ? | महानगरपालिकेचे बाबतीत आयुक्त तर नगरपरिषदांचे बाबतीत नगरपरिषदांचे मुख्याधिकारी हे प्राधिकृत अधिकारी राहतील. |

**आपला,**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

## गृह (परिवहन)विभाग

**अंतिम अधिसूचना क्रमांक ८९ : महाराष्ट्र मोटार वाहने (दुसरी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०८०७/प्र.क्र.१२२/परि-२, दिनांकित १२ जानेवारी, २०१०.**

**उद्देश :**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्याबाबतचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

"प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये येणा-या अर्जदारास अनुज्ञप्तीचा तपशिल पुरविण्यासाठी मोटार वाहन अधिनियम, १९८९, केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये शासकीय शुल्क आकारणी यासंबंधी कोणतीही तरतूद नाही. अनुज्ञप्ती तपशिलाकरिता अर्जदाराने अर्ज केल्यानंतर, अर्जदारास अनुज्ञप्ती विवरणपत्र जारी करण्यासाठीच्या कामात मोटार वाहन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचा बराच कार्यालयीन वेळ खर्च होत आहे. तसेच कार्यालयीन कामात त्यामुळे वाढ होत आहे. सदर माहिती ही निशुल्क द्यावी लागत असल्याने कार्यालयीन खर्चातही वाढ होत आहे. त्यामुळे सदर कार्यालयीन कामात व खर्चात होणारी वाढ भरुन काढण्याकरिता अनुज्ञप्ती तपशिलाकरिता शासकीय शुल्क ठरविणेबाबत महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १३ मध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने नियमात सुधारणा करणेबाबत प्रारुप अधिसूचना विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने तयार करुन जनतेकडून हरकती व सूचना मागविणेकरिता दिनांक २२ फेब्रुवारी, २००८ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली व उपविधान समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली. सदरहू प्रारुप अधिसूचना उपविधान समितीने दिनांक २५ जून, २००८ रोजीच्या बैठकीत विचारात घेतली व अधिसूचनेस मान्यता दिली. तद्नंतर आवश्यक कार्यवाही करुन विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने अंतिम अधिसूचना दिनांक १२ जानेवारी, २०१० रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे."

सदरहू अंतिम अधिसूचना दिनांक १७ फेब्रुवारी,२०११ रोजीच्या बैठकीत समितीपुढे विचारार्थ ठेवली असता "उपरोक्त अधिसूचनेत अनुज्ञप्तीचा तपशील देण्याकरिता रुपये २०/- एवढे कमी शुल्क का ठेवण्यात आले, याबाबतची कारणे समितीपुढे `वण्यात यावीत," या समितीच्या निदेशानुसार याबाबतची माहिती विभागाकडून मागविण्यात आली.

सदरहू मुद्दयाच्या अनुषंगाने विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती (परिशिष्ट अ) प्राप्त झाली. "अनुज्ञप्तीचा तपशील पुरविताना अर्जदारास अनुज्ञप्तीचा क्रमांक, जारी केल्याचा दिनांक, अनुज्ञप्ती धारकाचे नाव व पत्ता, वाहन चालविण्याचा संवर्ग, लायसन्सची विधी ग्राह्यता इ.बाबींचा तपशील एका पृष्ठात समाविष्ट करुन पुरविला जातो. तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ नियम ५६ नुसार नोंदणी प्राधिका-यास नोंदणी केलेल्या कोणत्याही १० किंवा त्यापेक्षा कमी वाहनांचा नोंदणीचा तपशील

पुरविण्यासाठी प्रत्येक प्रतीला रु.२०/- एवढी फी आकारण्यांत येते. या तरतुदीच्या धर्तीवर अनुज्ञप्तीच्या तपशीलातील माहितीचे स्वरुप विचारात घेता रु.२०/-एवढे बाजवी शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.

बहुसंख्य प्रकरणात अपघातग्रस्त व्यक्ती त्यास आर्थिक भरपाई करिता दावा दाखल करण्यास्तव सदर माहिती प्राप्त करीत असल्याचे दिसून येते अशी माहिती मागणारी व्यक्ती साधारणत: मध्यमवर्गीय अथवा निम्नउत्पन्न गटातील असल्याची शक्यता लक्षात घेऊन सदर वाजवी शुल्क प्रस्तावित केले आहे असे विभागाने कळविले आहे."

विभागाकडून प्राप्त झालेल्या उक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३ मार्च, २०११ रोजी सचिव, गृह (परिवहन) विभाग यांची साक्ष घेतली. विभागाने खुलाशात नमुद केलेल्या "बहुसंख्य प्रकरणात अपघातग्रस्त व्यक्ती त्यास आर्थिक भरपाई करिता दावा दाखल करण्यास्तव सदर माहिती प्राप्त करीत असल्याची बाब तसेच माहिती मागणारी व्यक्ती साधारणत: मध्यमवर्गीय अथवा निम्नउत्पन्न गटातील असल्याची शक्यता " या बाबी समितीने विचारात घेतल्या व या अधिसूचनेवर विचारविनिमय करुन उक्त अंतिम अधिसूचनेसंदर्भात काहीही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत.

# परिशिष्ट 'अ'

## अधिसूचना क्र. ८९

| | | |
|---|---|---|
| [illegible] ... [illegible] अनुषंगाने ... [illegible] सेवा [illegible] नियमावली [illegible] करण्यात आली आहे. | ४. [illegible] दि. [illegible] अधिसूचनेत [illegible] [illegible] ... [illegible] सर्व शुल्क ... [illegible] आहे. [illegible] करणे [illegible] [illegible] नवीन | १. [illegible] तातडीने [illegible] ... [illegible] ... [illegible] सध्या, ... [illegible] विषयी [illegible] ... [illegible] ... [illegible] ... [illegible] आणि [illegible] ... [illegible] ... [illegible] करण्यात ... [illegible] आहे ... [illegible] ... [illegible] आहे. |

तरी वरीलप्रमाणे मान्यता व्हावे, ही विनंती.

अपिला [illegible]

[illegible]

(ज्यो. मा. [illegible])

उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

[illegible]

## गृह (परिवहन) विभाग

**अंतिम अधिसूचना क्रमांक ११९ : महाराष्ट्र मोटार वाहन (सहावी सुधारणा) नियम २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०३१०/८८७/प्र.क्र.१८२/परि-२, दिनांकित १३ सप्टेंबर, २०१०.**

**उद्देश :**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

"मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी आणि वायुप्रदुषणाची पातळी नियंत्रित रहावी म्हणून ज्या वाहनाची इंजिन क्षमता ९८० सी.सी. पेक्षा कमी आहे अशा वाहनांना परवाना मंजूर करण्यात येऊ नये म्हणून महाराष्ट्र मोटार वाहन कायदा, १९८९ च्या नियम ११९ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा प्रस्ताविली आहे.

"(तीन) तीन चाकी ऑटोरिक्शाखेरीज आराम किंवा पर्यटक किंवा मॅक्सी कॅब किंवा जीप प्रकारची मोटार कॅब, अशा कॅबना ९८० सी.सी. पेक्षा कमी शक्तीचे नसेल असे इंजिन असेल."

त्याप्रमाणे महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ११९ मध्ये सुधारणा करणेबाबत अंतिम अधिसूचनेस विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यात आली असून महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग ४(अ) मध्ये दि.१३ सप्टेंबर, २०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. आता सदर अंतिम अधिसूचना उपविधान समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे".

उपरोक्त अधिसूचना दिनांक १७ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या बैठकीत समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आली असता समितीने सदरहू विषयाच्या संदर्भात तसेच " मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी आणि वायू प्रदुषणाची पातळी नियंत्रित रहावी यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ?", याबाबत संबधित विभागाकडून १५ दिवसांमध्ये माहिती मागविण्यात यावी व संबधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी, असा निर्णय घेतला.

सदरहू विषयासंदर्भातील दिनांक १ मार्च, २०११ रोजी खालील माहिती विभागाकडून प्राप्त झाली.

| अ.क्र | प्रश्न | माहिती |
|---|---|---|
| १. | मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी आणि वायु प्रदुषणाची पातळी नियंत्रित राहावी यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ? याबाबत तपशीलवार माहिती देण्यात यावी. | (१) वाहनांची पीयुसी तपासणी.<br>(२) मुंबईतील सीएनजी/एलपीजी केंद्रे.<br>(३) प्रदुषण तपासणी.<br>(४) प्रदुषण विषयक मानके.<br>(५) पर्यावरण कल इत्यादी बाबी प्रदुषण नियंत्रण तपासणी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तपासणी पथकामार्फत नियमित केली जाते. |

| | |
|---|---|
| | मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण / एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरण (UMMTA) इ. प्राधिकरणा- मार्फत वाहतूक समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टी- कोनातून खालीलप्रमाणे आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहेत.<br>(१) रेल्वे उपनगरी सेवेचे आधुनिकीकरण, विस्तारीकरण, मेट्रो रेल्वेची निर्मिती.<br>(२) बस वाहतुकीचे सक्षमीकरण व जलद बस सेवा.<br>(३) रस्त्यांच्या पायाभूत सुविधांचा विस्तार.<br>(४) समुद्रातून गारलॅण्ड रोडची निर्मिती करणे व समुद्रामार्गे प्रवासी वाहतूक. |

विभागाकडून प्राप्त झालेल्या वरील माहितीच्या अनुषंगाने दि. ३ मार्च, २०११ रोजी समितीने गृह (परिवहन) विभागाच्या अधिका-यांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या वेळी समितीने टॅक्सी किंवा बस असो, सर्वसामान्य लोकांना प्रवासाची सुविधा देताना कमीत कमी त्रास व्हावा असे परिवहन खात्याचे धोरण आहे, परंतु त्या प्रमाणात लोकांना सुविधा मिळायला पाहिजे तेवढया प्रमाणात मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. टेरिफ दर पेट्रोलच्या दरानुसार ठरविले जातात, असे स्पष्ट केले असता त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आता १०० टक्के वाहने सीएनजीवर झाली आहेत. टॅक्सी किंवा ऑटो रिक्षा असो त्यांच्या टेरिफ दराच्या संदर्भात एक समिती कार्यरत आहे, त्यांचा एक फार्म्युला आहे, त्याचा टेरिफ दरासाठी वापर केला जातो, डिझेलच्या दरानुसार टेरिफ दर आकारले जात नाही.

यावर समितीने विचारणा केली मुंबईत टॅक्सी व ऑटो रिक्षांमध्ये सीएनजीचा वापर होत असल्यामुळे त्यांचे टेरिफ दर स्वस्त व्हायला पाहिजे होते परंतु तसे झाले नाही. त्यामुळे सीएनजीचा जनतेला कोणताही फायदा झाला नाही. वाहने सीएनजीमध्ये कन्व्हर्ट करताना अनेकांनी सबसिडी घेतलेली आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, जी सबसिडी देण्यात आली होती ती फार कमी आहे. टेरिफ दर ठरवितांना त्यात सहा बाबीचा समावेश असतो. त्यात स्पेअर पार्ट, टायर्स, इंजिन इत्यादी बाबींवर होणा-या खर्चाचा समावेश असतो. त्यावर समितीने, एका किमीच्या प्रवासासाठी असलेल्या १३ रुपयांपैकी ५ रुपये डिझेल किंवा पेट्रोलसाठी ठेवले तरी उर्वरित रक्कम बाकीच्या पार्टसाठी असल्याचे गृहित धरल्यास त्यातून

जनतेला जेवढा फायदा मिळायला पाहिजे होता तेवढा मिळालेला नाही, यासंबंधीचा आढावा घेऊन सुधारित दर न केल्यामुळे लोकांना फायदा मिळू शकला नाही, असे मत व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंबंधी सर्व कॅलक्युलेशन केलेले आहे व त्यानुसार पेट्रोल व सीएनजीचा दर सारखाच येतो.

सदरहू साक्षीच्या वेळी विभागाकडून प्राप्त झालेली माहिती समितीने विचारात घेतली व त्यावर विचारविनिमय करुन अंतिम कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

**गृह (परिवहन) विभाग**

**अंतिम अधिसूचना क्रमांक १२० : महाराष्ट्र मोटार वाहन (सातवी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०४०८/८७२/प्र.क्र.२१२/परि-२, दिनांकित १३ सप्टेंबर, २०१०**

**उद्देश -**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

"महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५४ मध्ये नवीन नोंदणी चिन्ह देणे व नियम ५४ (अ) नुसार वाहनांचे आकर्षक नोंदणी क्रमांक देणेबाबत तरतूद असून ५४ (अ) मध्ये पोट-नियम (३) चा समावेश करुन पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याचे प्रस्ताविले आहे.

**"एखाद्या वाहन मालकाने जुने वाहन विकल्यानंतर त्यास नवीन वाहन घेताना पूर्वीच्या वाहनाचे नोंदणी चिन्ह नवीन खरेदी केलेल्या वाहनाकरिता धारण करण्याची इच्छा असल्यास नियमानुसार विहीत केलेली फी आकारुन सदर मूळ नोंदणी चिन्ह धारण करता येईल व नवीन मालकाने खरेदी केलेल्या मूळ वाहनाला नवीन नोंदणी चिन्ह देण्यात येईल."**

यासंदर्भातील अंतिम अधिसूचनेस विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यात आली असून महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग चार- अ मध्ये दिनांक १३ सप्टेंबर,२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अंतिम अधिसूचना उपविधान समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे."

उपरोक्त अधिसूचना दिनांक १७ फेब्रुवारी,२०११ रोजीच्या बैठकीत समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आली असता समितीने "एखाद्या व्यक्तीने नवीन गाडी घेतल्यानंतर त्याला जुन्या गाडीचा नंबर हवा असेल तर त्या दृष्टीने कोणती तरतूद करण्यात आली आहे? त्यासाठी किती फी आकारली जाते? याबाबत केंद्रीय परिवहन विभागाचा काय निर्णय आहे ?" या मुद्यावर गृह (परिवहन) विभागाकडून माहिती मागविण्याचा व विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला. सदरहू मुद्दयासंदर्भातील प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट 'अ'** मध्ये सादर करण्यात आली आहे. विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३ मार्च,२०११ रोजी समितीने गृह (परिवहन) विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या

वेळी समितीने ''एखाद्या व्यक्तीने नवीन गाडी घेतल्यानंतर त्याला जुन्या गाडीचा नंबर हवा असल्यास त्यादृष्टीने कोणती तरतुद करण्यात आली आहे? ''असे विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये नंबर पोर्टेबिलिटी स्किमबाबत पहिल्यांदाच योजना राबविण्यात आली आहे. वाहन मालकाने नवीन गाडी खरेदी केल्यानंतर जर त्याला जुन्या गाडीचा नंबर कायम ठेवावयाचा असेल तर त्यासाठी ही सवलत दिलेली आहे. परंतु त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या फी प्रमाणे रक्कम भरावयास पाहिजे.

समितीने विचारले की, नवीन गाडी विकत घेतल्यावर नंबर देण्यासाठी किती चार्ज केला जातो? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जर व्ही.आय.पी.नंबरची मागणी केली नसेल तर काहीही चार्ज करीत नाही. फक्त रजिस्ट्रेशन फी घेतो. समितीने विचारले की, व्ही.आय.पी.नंबरसाठी किती फी घेतली जाते ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कायद्यात असेल त्याप्रमाणे फी घेतली जाते. ठराविक नंबरसाठी पैसे घेतले जातात. बाकी कोणत्याही नंबरसाठी फी घेत नाही. सरकारी गाडयांचे व्ही.आय.पी.नंबर आहेत.

समितीने विचारले की, मार्केटमध्ये खुल्या प्रमाणात लाल दिवा विकत मिळतो. याबाबत कोणती कार्यवाही केली ? मार्केटमध्ये स्टीकरशिवाय लाल दिव्यांची विक्री केली जाते. परंतु स्टीकर असल्याशिवाय वाहनांवरील लाल दिवे वैध होऊ शकत नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. एखाद्या व्यक्तीने नवीन गाडी घेतल्यानंतर त्याला जुन्या गाडीचा नंबर हवा असल्यास त्यासाठी किती फी आकारली जाते असे सदस्यांनी विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या ५४ (अ) च्या पोट-नियम (२) खंड (१) मध्ये विहित केलेली फी आकारली जाते. आता नवीन प्रस्ताव केलेला आहे त्यानुसार शासकीय वाहनांसाठी व्हीआयपी नंबरचा वापर करायचा असल्यास त्याबाबत संबंधित त्या त्या विभागाकडून शुल्क आकारले जाणार आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, जुन्या वाहनावरील व्हीआयपी नंबर नवीन वाहनासाठी वापरायचा झाल्यास त्यासाठी तेवढीच रक्कम आकारणे ही बाब योग्य नाही. ही रक्कम कमी करणे आवश्यक आहे. जुन्या वाहनावरील व्हीआयपी नंबर नवीन वाहनासाठी वापरायचा असल्यास त्यासाठी येणारे शुल्क कमी करुन ते पूर्वीच्या नंबरसाठी भरलेल्या रकमेच्या १/३ इतके आकारण्यात यावे किंवा ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत करावे. उपरोक्त बाबींचा विचार करुन समितीने उक्त अधिसूचनेसंदर्भात खालीलप्रमाणे शिफारस केली.

**अभिप्राय व शिफारशी**

**''एखाद्या व्यक्तीने नवीन वाहन घेतल्यानंतर त्यावर जुन्या वाहनाचा नंबर लावण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क कमी करुन ते पूर्वीच्या नंबरसाठी भरलेल्या रकमेच्या १/३ इतके आकारण्यात यावे किंवा पहिल्या नंबरसाठी भरलेल्या रकमेच्या ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत आकारण्यात यावे. '' अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

# परिशिष्ट 'अ'

| अ.क्र. | विषय | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| १ | नवीन गाडी घेतल्यानंतर वाहन मालकास जुन्या गाडीचा नोंदणीक्रमांक देण्याबाबत दि.१३.९.२०१० च्या अधिसूचनेने अंतिम नियम प्रसिध्द करण्यात आले आहेत. | १. एखाद्या व्यक्तीने नवीन गाडी घेतल्यानंतर त्याला जुन्या गाडीचा नंबर हवा असल्यास त्या दृष्टीने कोणती तरतूद करण्यात आली आहे ? | १. एखाद्या व्यक्तीने नवीन वाहन विकत घेतल्यानंतर त्याला अन्य नोंदणी वाहन मालकाच्या जुन्या वाहनाचा क्रमांक देण्याबाबत महाराष्ट्र मोटार वाहन नियमामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे एखाद्या वाहन मालकाने स्वतःचे वाहन निरुपयोगी केले अथवा अन्य व्यक्तीस विकले तर त्यास अशा जुन्या वाहनाचा नोंदणी चिन्ह धारण करण्यासंदर्भात महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ ५४ (अ) मध्ये पोट नियम (३) नव्याने समाविष्ट करण्याबाबत दि.१३.९.२०१० नुसार अंतिम नियम विहित करण्यात आले आहेत. |
| | | २. त्यासाठी किती फी आकारली जाते ? | २. महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या ५४ (अ) मधील उप नियम (२) च्या खंड (चार) मध्ये विहित केलेली फी आकारली जाते.<br>याबाबत नियमाच्या छायांकीत प्रती जोडण्यात येत आहे. |
| | | ३. याबाबत केंद्रीय परिवहन विभागाचे काय निर्णय आहे ? | ३. याबाबत केंद्र शासनाने कोणतेही नियम विहित केलेले नाहीत. |

## गृह (परिवहन) विभाग

**प्रारुप अधिसूचना क्रमांक :- २४ महाराष्ट्र मोटार वाहन (आठवी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्रमांक एमव्हीआर. ०८०९/२२२१/प्र.क्र.३५४/परि-२, दिनांकित, २० एप्रिल, २०१०.**

**आणि**

**अंतिम अधिसूचना क्रमांक :- १०२ महाराष्ट्र मोटार वाहन (पाचवी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०८०९/२२२१/प्र.क्र.३५४/परि-२, दिनांकित, १४ जुलै, २०१०.**

**प्रारुप अधिसूचना क्रमांक :- २४ आणि अंतिम अधिसूचना क्रमांक १०२ चा उद्देश :**

उक्त प्रारुप व अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

" महाराष्ट्र राज्यात सध्या काळी पिवळी टॅक्सी, तीन व सहा आसनी ऑटोरिक्षा ही कमी आसनक्षमता असलेली सार्वजनिक सेवा वाहने उपलब्ध आहेत. मुंबई महानगरप्रमाणेच महाराष्ट्रातील पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, अमरावती इत्यादी शहरांचा प्रचंड विकास झालेला आहे. त्यामुळे या शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आस्थापना कार्यरत आहेत. अशा आस्थापनांच्या अधिकारी/कर्मचारी/ भेट देणारे इत्यादींसाठी तसेच देश विदेशातील पर्यटकांसाठी एक आरामदायी, वि वासार्ह तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने जोडलेली सार्वजनिक सेवा उपलब्ध होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्यात मुंबई महानगर क्षेत्रातील फ्लीट टॅक्सी सेवा योजना-२००६ अंतर्गत नोंद झालेल्या फ्लीट टॅक्सी वगळता इतरत्र रेडिओ ट्रॅकिंग सिस्टिम (जी. पी. एस./जी.पी. आर एस.) कार्यान्वित असलेली सेवा अस्तित्वात नाही. फ्लीट टॅक्सी सेवा लायसन्स धारकास नवीन टॅक्सी परवाने देण्यात आलेले नाहीत. त्यांना सध्याच्या टॅक्सी परवानाधारकांसोबत करार करुन नवीन वाहने नोंद करावी लागतात. फोन टॅक्सी योजनेमध्ये लायसन्स धारकांना परवाने देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सदरहू योजनेस मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे.

सदरहू योजनेमुळे प्रवाशांना इच्छीत स्थळी जाण्यासाठी फोनद्वारे बुकींग करुन वाहन मागविणे शक्य होईल, भाडे आकारणीमध्ये फसवणूक होणार नाही. आरामदायी सेवा मिळेल, सर्व वाहने नविन वातानुकुलीत व इलेक्ट्रॉनिक मीटरयुक्त असतील. या योजनेतील सर्व वाहने रेडिओ ट्रॅकिंग सिस्टीमने युक्त असतील. फोन टॅक्सी सेवेमुळे प्रवाशांना या सर्व बाबी उपलब्ध होतील. त्यानुषंगाने सदर योजना अंमलात आणण्याकरिता महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ६६ मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्ताविले असून प्रस्ताव विभागास्तरावर तपासून विधी व न्याय विभाग व शासन मान्यतेनंतर प्रारुप

अधिसूचना जनतेकडून हरकती व सूचना मागविण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग ४ (अ) मध्ये दि.२०.४.२०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. आता सदर अधिसूचना उपविधान समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

उक्त प्रारुप अधिसूचना गृह विभागाने दिनांक २० एप्रिल, २०१० रोजी राजपत्रात प्रसिध्द केली व या सचिवालयास दिनांक २८ जून, २०१० रोजीच्या पत्रान्वये उपविधान समितीच्या मान्यतेसाठी विधानमंडळाकडे पाठविली.

उपरोक्त प्रारुप अधिसूचना दिनांक ४ ऑगस्ट, २०११ रोजी झालेल्या बैठकीत विचारात घेण्यात आली असता समितीने प्रारुप अधिसूचनेतील मसुद्यात पुढीलप्रमाणे सुधारणा सुचविल्या.

(१) नियम ६६-अ (२) (ख) (सहा) मध्ये, प्रस्तावित मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :—

"फोन/फ्लीट टॅक्सी लायसन्सचे नवीकरण, त्याची मुदत समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत, नमुना " पीएफटीए " नुसार अर्ज करुन करता येईल. लायसनची मुदत समाप्त झाल्यानंतर त्याचे नवीकरण करण्याचे विलंब शुल्क पहिल्या ६० दिवसांसाठी रुपये २००/- प्रति दिन व त्यापुढील प्रत्येक दिवसासाठी रुपये ५००/- इतके असेल."

(२) नियम ६६-अ (२) (ख) (नऊ) मध्ये प्रस्तावित मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा.

"फोन/फ्लीट टॅक्सी लायसन्सची दुसरी प्रत मिळण्याचे शुल्क रुपये २०००/- इतके असेल."

(३) नियम ६६-अ (३) (ट) मध्ये प्रस्तावित मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा.

"आकारावयाचे भाडे राज्य परिवहन प्राधिकरण निश्चित करील व वाहनचालकास प्रवाशांना भाडे पावती देता येईल."

तसेच, नियम ६६ अ (२) (ग) (एक) या संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की,

मुंबई शहर व इतर जिल्हयांमध्ये इलेक्ट्रॉनिक भाडे मीटर बसविण्याची तरतूद आहे. पण त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होताना दिसत नाही. टॅक्सीधारक संघटना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याची टाळाटाळ करीत असतात. ज्या ज्या वेळी भाडेवाढ होते त्यावेळीसुध्दा मीटर व वाढलेल्या भाडयाचे टेबल यामध्ये विसंगती राहते. वाढीव भाडे तात्काळ मीटरमध्ये दाखवण्याची प्रक्रिया कार्यान्वित होणे आवश्यक आहे. या संदर्भात विभागाकडून अधिक खुलासा मागविण्याबाबत समितीने निदेश दिले.

दरम्यानच्या काळात सदरहू प्रारुप अधिसूचनेच्या अनुषंगाने अंतिम अधिसूचना गृह विभागाने दिनांक १४ जुलै, २०१० रोजी राजपत्रात प्रसिध्द केली व विधानमंडळ सचिवालयास ती दिनांक १२ ऑगस्ट, २०१० रोजी उपविधान समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात आली. सदरहू अंतिम अधिसूचना दिनांक १९ फेब्रुवारी,

२०११ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली असता समितीने प्रारुप अधिसूचनेसंदर्भात दिनांक १२ ऑगस्ट, २०१० रोजीच्या पत्रान्वये जे मुद्दे पाठविण्यात आलेले होते त्याबाबतचा खुलासा प्राप्त झालेला नसल्याने समितीने, खालील मुद्यांवर गृह (परिवहन) विभागाकडून माहिती मागविण्याचा व विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

" (१) या अधिसूचनेची प्रारुप अधिसूचना उपविधान समितीपुढे सादर करण्यात आली असता समितीने प्रारुप अधिसूचनेच्या मसुदयांत सुधारणा सुचविल्या होत्या. तसेच प्रारुप अधिसूचनेतील नियम ६६ अ (२) (ग) (एक) संदर्भात १५ दिवसांत अधिक खुलासा समितीपुढे सादर करावा असे विभागास दिनांक १२ ऑगस्ट, २०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. परंतु सदरहू खुलासा अद्याप प्राप्त झालेला नाही. त्याबाबतच्या विलबांच्या कारणांसह उपरोक्त खुलासा तात्काळ समितीकडे पाठविण्यात यावा.

(२) तसेच ए.सी. टॅक्सीप्रमाणे काळया - पिवळया टॅक्सीमध्ये ए.सी. (वातानुकुलित यंत्राची) सोय करणे शक्य होईल का ? यादृष्टीने परिवहन विभागासमोर प्रस्ताव विचाराधीन आहे काय ?"

सदरहू मुद्दयासंदर्भातील विभागाकडून प्राप्त झालेली माहिती परिशिष्ट (अ) मध्ये दर्शविण्यात आली आहे.

विभागाकडून प्राप्त झालेल्या या माहितीच्या अनुषंगाने दि.३ मार्च,२०११ रोजी समितीने गृह (परिवहन) विभागाची साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या वेळी समितीने काळया-पिवळया टॅक्सीमध्ये जर ए.सी. बसविला असेल आणि प्रवाशांनी ए.सी. चालू करण्याची मागणी केली तर १० टक्के जादा भाडे आकारण्यास मान्यता देण्यास काय हरकत आहे ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदरहू विषय विचाराधीन आहे. त्यावर समितीने सांगितले की, काळया-पिवळया टॅक्सीमध्ये बसल्यानंतर ए.सी. चालू केला तर त्यासाठी १० टक्के जादा भाडे दिले तर त्याला ते परवडते. यापुढे मुंबईमध्ये सामान्य माणसाला सुध्दा ए.सी. शिवाय प्रवास करता येणार नाही, अशी परिस्थिती आहे. काळया-पिवळया टॅक्सीमध्ये सामान्य माणसाला ए.सी.ची सुविधा मिळवून देणे हा सुध्दा आपला दृष्टीकोन असला पाहिजे.

उक्त साक्षीदरम्यान झालेल्या बैठकीत दिनांक १ मार्च, २०११ रोजी प्राप्त झालेली माहिती **(परिशिष्ट अ)** समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आली. विभागाने पाठविलेल्या माहितीत समितीने विचारलेल्या अनुक्रमांक १ ते ३ च्या मुद्दयांसंदर्भात काहीही माहिती नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे समितीने प्रारुप अधिसूचनेसंदर्भात केलेल्या शिफारशी अंतिम अधिसूचनेसही लागू केल्या आहेत.

अभिप्राय व शिफारशी :-

समिती या अंतिम अधिसूचनेवर खालीलप्रमाणे शिफारशी करत आहेत.

(१) नियम ६६-अ (२) (ख) (सहा) मध्ये, प्रस्तावित मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :-

" फोन/फ्लीट टॅक्सी लायसनचे नवीकरण, त्याची मुदत समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत, नमुना " पीएफटीए " नुसार अर्ज करुन करता येईल. लायसनची मुदत समाप्त झाल्यानंतर त्याचे नवीकरण करण्याचे विलंब शुल्क पहिल्या ६० दिवसांसाठी रुपये २००/- प्रती दिन व त्यापुढील प्रत्येक दिवसासाठी रुपये ५००/- इतके असेल."

(२) नियम ६६-अ (२) (ख) (नऊ) मध्ये प्रस्तावित मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा.

" फोन/फ्लीट टॅक्सी लायसनची दुसरी प्रत मिळण्याचे शुल्क रुपये २०००/- इतके असेल."

(३) नियम ६६-अ (३) (ट) मध्ये प्रस्तावित मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा.

" आकारावयाचे भाडे राज्य परिवहन प्राधिकरण निश्चित करील व वाहनचालकास प्रवाशांना भाडे पावती देता येईल."

(४) नियम ६६ अ (२) (ग) (एक) या संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, मुंबई शहर व इतर जिल्हयांमध्ये इलेक्ट्रॉनिक भाडे मिटर बसविण्याची तरतूद आहे. पण त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होताना दिसत नाही. टॅक्सीधारक संघटना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याची टाळाटाळ करीत असतात. ज्या ज्या वेळी भाडेवाढ होते त्यावेळी सुध्दा मीटर व वाढलेल्या भाडयाचे टेबल यामध्ये विसंगती राहते. वाढीव भाडे तात्काळ मीटरमध्ये दाखवण्याची प्रक्रिया कार्यान्वित होणे आवश्यक आहे, यासंदर्भात शासनाने उचित कार्यवाही करावी.

# परिशिष्ट 'अ'

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्र. २४ अ. ३०२ | ३ | फोन फ्लीट टॅक्सी योजनेच्या संदर्भात दि.१४.७.२०१० रोजी अंतिम नियमावली प्रसिध्द करण्यांत आली आहे. | १. समितीने दि.२०.४.२०१० च्या प्रारुप नियमावली सुधारणा सुचविल्या आहेत. तसेच नियम ६६ अ (२) (ग) (एक) संदर्भात दि.१२.८.२०१० च्या पत्रान्वये १५ दिवसात खुलासा सादर करण्यांबाबत कळविण्यांत येवूनही प्राप्त न झालेल्या विलंबाच्या कारणासह खुलासा सादर करावा ? | १. दि.१२.८.२०१० च्या पत्रान्वये समितीने खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले आहेत.<br>१. फोन फ्लीट टॅक्सीचे नवीनीकरण, त्याची मुदत समाप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत, नमुना पीएफटीए नुसार अर्ज करुन, करता येईल. लायसन्सची मुदत समाप्त झाल्यानंतर त्याचे नवीकरण करण्याचे विलंब शुल्क *पहिल्या ६० दिवसांसाठी रु. २००/- प्रतिदिन व त्यापुढील प्रत्येक दिवसासाठी रु. ५००/- इतके असेल.*<br>२. फोन फ्लीट टॅक्सी लायसन्सची दुसरी प्रत मिळविण्याचे शुल्क रु. २०००/- इतके असेल.<br>३. प्रस्तावातील मजकुरातील "जाणे ऐवजी " जेणे" हा मजकूर दाखल करण्यात यावा.<br>४.आकारावयाचे भाडे राज्य परिवहन प्राधिकरण निश्चित करील व वाहनचालकास प्रवाशांना भाडे पावती देता येईल.<br><br>५. नियम ६६ अ (२)(ग)(एक) च्या संदर्भात समितीने व्यक्त केलेले मत......मुंबई शहर व इतर जिल्हयामध्ये इलेक्टॉनिक भाडे मिटर बसविण्याची तरतूद आहे. पण त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होताना दिसत नाही. टॅक्सी धारक संघटना इलेक्ट्रॉनिक |

E:\tra-2\R.G.GAIKWAD\letter.lwp

मीटर बसविण्याची टाळा-टाळ करीत असतात. ज्या-ज्या वेळी भाडे वाढ होते त्यावेळेस सुध्दा मीटर व वाढलेल्या भाडेकार्ड यामध्ये विसंगती राहते. वाढीव भाडे तात्काळ मीटरमध्ये दाखविण्याची प्रक्रिया होणे आवश्यक आहे. या संदर्भात विभागाने अधिक खुलासा करण्याचे निदेश समितीने दिले आहेत.

<u>अभिप्राय</u> :-

वरील क्रमांक ३ प्रमाणे अंतिम अधिसूचनेत सुधारणा करण्यांत आली आहे. इतर मुद्यांच्या संदर्भात सादर करण्यांत येते की, जनतेकडून/संघटनेकडून विहित केलेल्या नियमात सुधारणा करण्यासाठी मागणी होत असल्याने तसेच या योजनेत महिला बचत गट सहकारी संस्था, मागासवर्गीय संस्था, माजी सैनिक यांच्या कल्याणासाठी परवाना देण्याची बाब विचाराधीन असून उप विधान समितीने सूचविलेल्या सुधारणांचा या नियमामध्ये सुधारणा करताना फेरविचार करण्यांत येईल. परिवहन आयुक्त यांच्या स्तरावरुन शासनास प्रशासकीय कारणास्तव विलंबाने अभिप्राय प्राप्त झाल्याने समितीस माहिती सादर करता आली नाही. तसेच मुंबई व्यतिरिक्त इतर शहरात काळी पिवळी मीटर टॅक्सी नोंदणीचे प्रमाण अत्यल्प आहे. मुंबई शहरात नव्याने नोंदणी करण्यात येणा-या सर्व काळया पिवळया टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणे बंधनकारक करण्यांत आले असून त्याची काटेकोरणपणे अंमलबजावणी करण्यांत येत आहे.

इलेक्ट्रॉनिक मीटर बसविलेल्या काळया पिवळया टॅक्सींची मुंबईतील संख्या सुमारे १६००० इतकी असून मुंबई शहरातील इलेक्ट्रॉनिक मीटर दुरुस्तीसाठी अधिकृत केंद्राची संख्या २५ इतकी आहे. सबब भाडे वाढ झाल्यानंतर सर्व काळया पिवळया टॅक्सींमध्ये मीटर कॅलीब्रेशन करण्यास सुमारे ३ ते ४ महिन्याचा कालवधी लागतो. तथापि, मीटर भाडे वाढ लागू होताच टॅक्सी टेरीफ कार्ड छापण्यात येऊन सर्व परवाना धारकांना व संघटनेच्या प्रतिनिधींना सदर टेरीफ कार्ड विनामुल्य उपलब्ध करुन देण्यांत येते. तसेच स्थानिक वृत्तपत्रांमधून देखील त्यास प्रसिध्दी देण्यांत येते इलेक्ट्रॉनिक मीटर दुरुस्तीसाठी अधिकृत केंद्राची संख्या वाढविण्याविषयी

४५

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मीटर उत्पादक कंपन्यांना सुचना द आल्या आहेत. |
| | | २. ए.सी. टॅक्सी प्रमाणे काळया पिवळया टॅक्सी मध्ये ए.सी. (वातानुकुलीत यंत्राची) सोय करणे शक्य होईल का ?<br>३. त्या दृष्टीने परिवहन विभागा समोर प्रस्ताव विचाराधीन आहे काय ? | २. व ३. मुंबई टॅक्सी मेन्स युनियन यांनी त्यांच्या दि.७.८.२०१० च्या पत्राद्वारे काळया पिवळया टॅक्सींना वातानुकुलित यंत्रणा बसविण्यास व प्रवाशांनी यंत्रणा सुरु करण्याची मागणी केल्यास १० टक्के ज्यादा भाडे आकारण्यास मान्यता देण्याची विनंती केली होती. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण मुंबई महानगर क्षेत्र यांनी पारित केलेला ठराव क्र.१/२०१० नुसार परवान्यावर नवीन बदली वाहन सादर करणे बंधनकारक केल्याने नव्याने नोंद होणा-या टॅक्सींची संख्या वाढत आहे. नवीन वाहनांना वाहन उत्पादकांकडून मुलतःच वातानुकूलित यंत्रणा बसविलेली असते.<br>प्रादेशिक परिवहन प्राधिकरण मुंबई महानगर क्षेत्र यांच्या दि.५.२.२०११ बैठकीत प्रस्तुत बाब विचारार्थ ठेवण्यांत आलेली असता सद्यस्थितीत सदर बाब प्रतिक्षाधीन ठेवण्यांत आली आहे. |

(iv) The Registering Authority shall reserve a registration mark to the owner of a motor vehicle of his choice from amongst the registration mark on payment of fees as specified below, namely :–

| Serial No. | Registration Number | Other than two and three wheelers and transport vehicles. | Two and three wheelers and transport vehicles |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | 1 | 1,00,000 | 25,000 |
| 2 | 9, 99, 111, 222, 333, 444, 555, 666, 777, 786, 888, 999, 1111, 2222, 3333, 4444, 5555, 6666, 7777, 8888, 9999. | 50,000 | 10,000 |
| 3 | 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 10, 11, 22, 33, 44, 55, 66, 77, 100, 123, 234, 345, 456, 500, 505, 678, 900, 1000, 1234, 1515, 1818, 2345, 2525, 2727, 3456, 3636, 4545, 4567, 5000, 5454, 5678, 6363, 6789, 7272, 8181, 9000, 9090. | 25,000 | 5,000 |
| 4 | 88, 101, 200, 202, 300, 303, 400, 404, 567, 600, 606, 700, 800, 808, 909, 1001, 1010, 1011, 1112, 1212, 1213, 1221, 1313, 1314, 1331, 1414, 1415, 1516, 1616, 1617, 1717, 1718, 1819, 1919, 1920, 2000, 2020, 2021, 2121, 2323, 2324, 2424, 2425, 2526, 2627, 2728, 2828, 2829, 2929, 3233, 3434, 3435, 3535, 3536, 3737, 3738, 3838, 3839, 3939, 3940, 4000, 4040, 4041, 4141, 4142, 4242, 4243, 4343, 4344, 4546, 4646, 4647, 4747, 4748, 4848, 4849, 4949, 5005, 5050, 5051, 5151, 5152, 5252, | 7,500 | 4,000 |

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| | 5253, 5353, 5455, 5656, 5657, 5757, 5758, 5858, 5859, 5959, 5960, 5995, 6000, 6060, 6061, 6161, 6162, 6262, 6263, 6364, 6465, 6565, 6566, 6767, 6768, 6868, 6869, 6969, 6970, 7000, 7007, 7070, 7071, 7171, 7172, 7273, 7373, 7374, 7474, 7475, 7575, 7576, 7676, 7677, 7878, 7879, 7979, 7080, 8000, 8008, 8080, 8081, 8182, 8282, 8283, 8383, 8384, 8484, 8485, 8585, 8586, 8686, 8687, 8787, 8788, 8989, 8990, 9091, 9191, 9192, 9292, 9293, 9393, 9394, 9494, 9495, 9595, 9596, 9696, 9697, 9797, 9798, 9898. | | |
| 5 | Additional charge for any number. More that 1000 from the last serial number. | 5,000 | 3,000 |
| 6 | Additional charge for any number than is a non-serial number *i.e.* jumping number upto 1000. | 3,000 | 2,000 |

(*c*) The registration numbers once reserved shall not be transferable and shall be allotted strictly on the principle of First Come First Basis;".

(*b*) In clause (*vi*) for the words " under sub-rule (*iii*) ", the words " under sub-rule (*iv*) " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. M. CHAVAN,
Deputy Secretary to Government.

## गृह (परिवहन) विभाग

**प्रारुप अधिसूचना क्रमांक - १ : महाराष्ट्र मोटार वाहन (नववी सुधारणा ) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमव्हीआर.०४१०/११२८/प्र.क्र.२९५/परि-२, दिनांकित २५ जून, २०१०.**

**उद्देश :**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

(१) पुणे शहरातील आय.टी. व बी.पी.ओ. कंपन्यांच्या निर्देशानुसार गुलाबी (Pink) किंवा पांढ-या (White) रंगाचा शर्ट तसेच काळी (Black) किंवा पांढ-या (white) रंगाची पॅन्ट असा रंगाचा गणवेश ७० ते ८० टक्के कॅब चालक परिधान करीत आहेत. त्यानुसार पुणे शहरातील कॅब चालकांच्या गणवेश रंगाबाबत गुलाबी रंगाचा शर्ट व काळया रंगाची पॅन्ट असा गणवेश असावा म्हणून परिवहन कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्यातील आय. टी./ बी. पी.ओ. कंपन्यांमध्ये काम करणा-या किंवा कंपन्यामध्ये भाडेतत्वावर मोटार कॅब चालविणा-या कॅब चालकांचा गुलाबी रंगाचा शर्ट व काळया रंगाची पॅन्ट असा गणवेश प्रस्तावित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२) मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १३८ च्या पोट-कलम (२) च्या उप खंड (त्र) अन्वये याबाबतीत कॅब चालकांचा गणवेश निश्चित करण्याचे अधिकार शासनास प्रदान करण्यात आलेले आहेत. सदरहू अधिकाराचा वापर करुन राज्यातील आय.टी.व बी.पी.ओ. कंपन्यातील कॅब चालकांच्या गणवेशाबाबत महाराष्ट्र मोटार.वाहन नियम, १९८९ च्या नियम २१ च्या पोट-नियम (१८) मध्ये दाखल करावयाच्या जादा परंतुकाचे प्रारुप विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात येऊन पोट-नियम (१८) खालील परंतुकानंतर खालील जादा परंतुक दाखल करण्यात आले आहे.

**(क) " परंतु, मोटार कॅबचा वाहक किंवा परवानाधारक जेव्हा माहिती व तंत्रज्ञान (आय. टी.) किंवा बीपीओ केंद्रामध्ये कंत्राटी पध्दतीने स्वत: मोटार चालवीत असेल तेव्हा तो स्वच्छ गुलाबी शर्ट आणि काळी पॅन्ट परिधान करील."**

**(ख) विद्यमान परंतुकामध्ये, " परंतु " या मजकुराऐवजी " परंतु आणखी असे की, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.**

वरील परंतुक समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने प्रारुप अधिसूचना दिनांक २५ जून,२०१० रोजी शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द केली.

उपरोक्त अधिसूचना समितीने औरंगाबाद येथे दिनांक २४ जून,२०११ रोजी झालेल्या बैठकीत विचारात घेतली.

या अधिसूचनेसंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणातील लक्झरी टॅक्सीकरिता ही बाब आहे. प्रामुख्याने पुण्याच्या आय.टी.व बी.पी.ओ. पुरताच हा विषय मर्यादित आहे. पुण्यातील टुरिस्ट टॅक्सी व्यतिरिक्त लक्झरी टॅक्सीच्या परवान्याचा, त्या एरिया पुरता, हा विषय आहे. पुण्यातील सर्वसाधारण कंपन्यामध्ये चालविल्या जाणा-या लक्झरी वाहनाच्या संदर्भातील हा विषय आहे. टुरिस्ट टॅक्सीला ऑल इंडिया परमीट दिले जाते. पुण्यामध्ये अशा प्रकारच्या ज्या टॅक्सीज चालविल्या जातात त्यांच्या चालकांना नियमानुसार कोणत्याही प्रकारचा गणवेश नव्हता. या वाहन चालकांचा जो गणवेश होता तो टुरीस्ट टॅक्सी चालकांचा होता. टुरिस्ट टॅक्सी चालकांचा ड्रेस हा खाकी पँट व पांढरा शर्ट असा आहे. तोच गणवेश हे लक्झरी कॅब चालक वापरत होते. पुण्याच्या लक्झरी टॅक्सी चालकांच्या गणवेशाच्या संदर्भात लोकप्रतिनिधींकडूनही मागणी करण्यात आली होती. संघटनेने सुध्दा या गणवेशाला पसंती दिलेली आहे. लोकांच्या मागणीनुसार हा गणवेश प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

जे लक्झरी कॅब चालक गणवेश परिधान करणार नाही त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? असे समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, सदरहू नियम अंमलात आल्यानंतर त्याप्रमाणे संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

**समितीने या सर्व बाबी विचारात घेता या अधिसूचनेवर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

## गृह (परिवहन) विभाग

**प्रारुप अधिसूचना क्रमांक : ३० - महाराष्ट्र मोटार वाहन (दहावी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०१०४/प्र.क्र.४३/परि-२, दिनांकित ३० ऑक्टोबर, २०१०.**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

**उद्देश :**

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १३४ (४) नुसार महानगरपालिकेच्या शहर सेवेतील बसगाडया तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेतील बसगाडया यांची रंगसंगती निश्चित करण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास प्रदान करण्यात आलेले आहेत. याव्यतिरिक्त अन्य परिवहन वाहने, फ्लीट टॅक्सी यासह सर्वच वाहनाच्या रंगसंगतीचे अधिकार शासनास आहेत. तथापि परिवहन उपक्रमांद्वारे अवैध प्रवासी वाहतूकीस तोंड देण्याच्या हेतूने प्रवाशांना परिवहन उपक्रमांच्या बससेवेकडे आकर्षित करण्याकरिता, उपक्रमाच्या ताफ्यामध्ये नव्याने दाखल होणा-या बसेसना लाल रंगाव्यतिरिक्त, इतर आकर्षक रंगामध्ये रंगविण्याची परवानगी मिळणेबाबतचे अर्ज शासनाकडे प्राप्त होत असल्याने आणि प्रत्येक वेळी वेगवेगळया वाहनांच्या रंगसंगतीकरिता नियमात सुधारणा करण्याची बाब

अत्यंत जिकीरीची व वेळेचा अपव्यय करणारी असल्यामुळे रंगसंगती निश्चिती करण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास प्रदान करण्याची आवश्यकता विचारात घेता महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १३४ व नियम १३५ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र राज्य मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १३४ (३) च्या परंतुकामध्ये " नगरपालिकेचे परिवहन सेवेतील टप्पा वाहन सिग्नलच्या लाल रंगाने " या मजकूराऐवजी " नगरपालिकेचे परिवहन सेवेतील टप्पा वाहन सिग्नलच्या लाल रंगाने किंवा राज्य प्राधिकरणाने, वेळोवेळी मान्यता दिलेल्या रीतीने रंगविण्यात येईल. " असा मजकूर समाविष्ट करण्यात आला असून नियम १३५ मध्ये, पोट नियम (८) नंतर पुढील परंतुक आणि खालील जादा पोट-नियम दाखल करण्यात आले आहेत.

" परंतु, टॅक्सी सेवेच्या कोणत्याही गटाशी संलग्न असलेली प्रत्येक मोटार कॅब, राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या रंगाने रंगविण्यात येईल.

९. सर्व प्रकारच्या ऑटोरिक्षा राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या रंगसंगतीनुसार रंगविण्यात येतील.

१० (अ) स्कूल बस कंत्राटी वाहन परवाना असलेली आणि केवळ शाळेतील मुलांची ने-आण करण्याकरिता असलेली वाहने पिवळया रंगाने रंगविण्यात येतील आणि वाहनाच्या पुढच्या आणि मागच्या बाजुला " स्कूल बस " असे रंगविण्यात येईल.

(ब) शाळेचे कंत्राट असलेल्या आणि तसेच कोणतेही अन्य कंत्राट असलेल्या वाहनांना पिवळया रंगाने रंगविणे आवश्यक असणार नाही परंतु वाहनाच्या सर्व बाजुंच्या मध्यभागी २० इंचाची पट्टी पिवळया रंगाने रंगविण्यात येईल"

त्यानुसार महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १३४ व १३५ मध्ये सुधारणा करण्याबाबत प्रारुप अधिसूचना विधी व न्याय विभागाची मान्यता घेऊन महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग ४ (अ) मध्ये दिनांक ३० ऑक्टोबर, २०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. आता सदर प्रारुप अधिसूचना उपविधान समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त अधिसूचना दिनांक १७ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या बैठकीत विचारात घेतली असता तद्संदर्भात समितीने काही मुद्यांवर विभागाकडून माहिती मागविण्याचा निर्णय घेतला. समितीने उपस्थित केलेले मुद्दे व त्यावर गृह (परिवहन) विभागाकडून प्राप्त झालेली माहिती परिशिष्ट (अ) मध्ये उद्धृत करण्यात आली आहे.

गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३ मार्च, २०११ रोजी गृह (परिवहन) विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान समितीने गाड्यांचे रंग ठरविण्याचे अधिकार कोणाला असतात? अशी विचारणा केली असता त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की,

राज्य परिवहन प्राधिकरणासमोर जाऊन रंगाच्या बाबतीत मान्यता घ्यावी लागते. काळया पिवळया टॅक्सीमध्ये जर वातानुकूल यंत्रणा बसविली असेल व प्रवाशांनी जर ती चालू करण्यास सांगितली तर ठराविक प्रमाणात जादा भाडे आकारण्यास मान्यता देण्याबाबत विभागाचे काय अभिप्राय आहेत अशी पृच्छा समितीने केली असता सदरहू बाब विचाराधीन असल्याचे विभागीय अधिका-यांनी सांगितले.

उपरोक्त साक्षीदरम्यान समितीने " टॅक्सी सेवेच्या कोणत्याही गटाशी संलग्न असलेल्या टॅक्सी तसेच रिक्षांना वेगवेगळया रंगाचा वापर केल्याचे दिसून येते. तद्संदर्भात अधिनियमातील तरतूदी तसेच बेस्टच्या बसेस व एसी बसेसच्या रंगसंगती संदर्भात अधिनियमात काय तरतूदी आहेत? " या मुद्दयांसंदर्भात विभागाकडून माहिती मागविण्याचा निर्णय घेतला त्यानुषंगाने समितीने उपस्थित केलेले मुद्दे व त्यावर विभागाकडून प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट (ब)** मध्ये नमूद केली आहे.

विभागाकडून प्राप्त झालेली सदरहू माहिती दिनांक २४ जून, २०११ रोजीच्या बैठकीत विचारात घेण्यात आली व त्यावेळी विभागीय सचिवांची साक्षही घेण्यात आली.

या साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, " रिक्षा, टॅक्सी इत्यादींची रंगसंगती ठरविण्याचे अधिकार परिवहन प्राधिकरणाला असावेत यासाठी नियमामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. एस.टी.च्या रंगसंगतीला परिवहन प्राधिकरण मान्यता देते. परंतु प्रवासी टॅक्सी, रिक्षा, फ्लीट टॅक्सी यांची रंगसंगती निश्चित करण्यासाठी शासनाकडे जावे लागते. ही रंगसंगती ठरविण्याचे अधिकार परिवहन प्राधिकरणाला असावेत, अशा प्रकारची सुधारणा नियमामध्ये केलेली आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या १३५(१) नुसार ऑटो रिक्षांचा रंग ठरविण्यात आलेला आहे. परंतु ज्या रिक्षावाल्याला जो रंग पाहिजे त्या रंगाचा रेक्झीन हूड तो लावत असतो अशी परिस्थिती आहे. ग्रामीण भागात आता सफेद रंगाच्या चार चाकी मॅजीक गाडया आलेल्या आहेत. या गाडयांना रंगाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे बंधन घातलेले दिसत नाही. मॅजीक टॅक्सीला आपण परवानगी दिलेली आहे काय ? रिक्षाला कोणताही कलर देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, रिक्षाच्या खालच्या बाजूच्या काळया रंगाला शासनाने परवानगी दिलेली आहे. परंतु रेक्झीन हूडच्या संदर्भात कोणतेही बंधन नाही. रेक्झीन हूडला कलर घालण्याचे बंधन पूर्वी घालण्यात आले होते. चार चाकी मॅजीक गाडया सफेद रंगात येतात व या गाडयांना टॅक्सीचा परवाना दिला जातो. परंतु सर्व मॅजीक चालकांजवळ टॅक्सीचा परवाना आहेच असे नाही. हे वाहन कार म्हणून घेतले जाते. कंपनीतून तयार झालेली वाहने चेक करण्यासाठी तसेच त्यांची गुणवत्ता, कॅपेसीटी, सुरक्षा तपासण्यासाठी केंद्र शासनाने VRDA,ARAI,ARDA,IIP अशा चार एजन्सीकडे काम दिले असून यांसदर्भातील निर्णय या चार एजन्सीजच घेत असतात. यासंदर्भात पूर्वी परिवहन आयुक्तांकडे अधिकार होते परंतु हे अधिकार एक वर्षापूर्वी परिवहन आयुक्तांकडून काढून घेण्यात आलेले आहेत.

टॅक्सी संवर्गात जी टुरिस्ट टॅक्सी आणि काळी पिवळी टॅक्सी असते ती ९८० सीसीपेक्षा जास्त क्षमतेची असावी लागते, ९८० सीसीपेक्षा कमी क्षमतेच्या वाहनांना टॅक्सीचा परवाना दिला जात नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. त्यावर, या वर्षभरात ९८० सीसी पेक्षा कमी कॅपॅसिटीच्या गाड्यांना परवाने दिले गेले असतील तर त्याबाबतीत काय कारवाई करणार आहात ? अशी पृच्छा समितीने केली असता, हा नियम लागू झाल्यानंतर परवाने दिले गेले असतील तर ते रद्द करण्यात येतील. तसेच ज्यांनी परवाने दिले त्यांची चौकशी करण्यात येईल, त्याबाबतचा अहवाल समितीसमोर सादर करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

खाजगी गाड्यांवरील नंबर प्लेट " दादा ", " मामा " याप्रमाणे दिसणा-या असतात. अशा नंबर प्लेट असलेल्या गाड्यांच्या बाबतीत काय कारवाई करण्यात येते ? नंबर प्लेट कशी असावी यासंबंधीचे नियम आहेत. अशा नंबर प्लेट असलेल्या गाड्यांच्या बाबतीत कारवाई करण्याचे अधिकार परिवहन प्राधिकरणास आणि पोलिसांना देखील आहेत, याबाबतीत वेळोवेळी मोहीम चालू असते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**सदरहू अधिसूचनेच्या अनुषंगाने समितीने वरीलप्रमाणे विचारविनिमय केल्यानंतर या अधिसूचनेवर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

# परिशिष्ट 'अ'

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | वाहनाच्या रंगसंगतीबाबत दि.३०.१०.२०१० रोजी प्रारुप नियमावली प्रसिध्द करण्यांत आली आहे. | १. टॅक्सीसेवेच्या कोणत्याही गटाशी सलग्न असलेल्या टॅक्सी तसेच रिक्शाना वेगवेगळया रंगाचा वापर केलेला दिसून येतो. टॅक्सी व रिक्शाच्या रंगाबाबत केंद्रीय परिवहन विभागाने शासन निर्णय काढला आहे काय ?<br>२. असल्यास तो समितीपुढे सादर करावा. तसेच उक्त अधिसूचनेच्या प्रारुपास जनतेकडून सुधारणा मागविण्यांत आल्या होत्या काय? | १. व २. फोन प्लीट टॅक्सी योजनेमध्ये अंतर्भुत असलेल्या रंगसंगतीस मान्यता देण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास देण्यांत आले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १३५ मध्ये पोट नियम (८) नंतर नवीन परंतुक दाखल करण्यांत आले असून त्यानुसार टॅक्सी सेवेच्या कोणत्याही गटाशी संलग्न असलेली प्रत्येक मोटर कॅब ही राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या रंगाप्रमाणे रंगवावी लागेल.<br>टॅक्सी रिक्शाच्या रंगसंगतीबाबत केंद्र शासनाद्वारे आदेश अथवा निर्णय काढण्यांत आलेले नाहीत. परिवहन वाहनाबाबत रंगसंगती निश्चित करण्याचे अधिकार मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ९६ (२) (अठरा) अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यांत आले आहेत.<br>काही रिक्शाना केवळ ग्रामीण भागाकरीता परवाने देण्यांत येतात. त्यांनी शहरात येवून व्यवसाय करु नये यासाठी वेगळी रंगसंगती असणे आवश्यक आहे. तसेच सी.एन. जी./एल.पी.जी. रिक्शांसाठी भाडेदर वेगळे असतात. सामान्य नागरीकांना रिक्शातील फरक समजण्यासाठी रिक्शाना वेगळी रंगसंगती असणे आवश्यक आहे. दिल्ली शहरात सी.एन.जी.वरील रिक्शान हिरव्या रंगात रंगविण्यांत आल्या आहेत. |
| | | ३. असल्यास जनतेकडून प्राप्त झालेल्या सुधारणा/सूचना/ तक्रारींचा तपशील समितीपुढे सादर करावा. | ३. दि.३०.१०.२०१० रोजी प्रसिध्द करण्यांत आलेली प्रारुप अधिसूचना दि.१५.११.२०१० च्या शासनपत्राद्वारे जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यांकरीता सर्व परिवहन कार्यालयास पाठविण्यांत आली. परंतु अद्याप सूचना किंवा तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत. |

# परिशिष्ट 'ब'

महाराष्ट्र शासन प्र५४ - ३०

क्र. एमव्हीआर-०१०४/प्र.क्र.४३/परि-२,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
दिनांक १८.०६.२०११

प्रति,

अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानमंडळ, मुंबई

विषयः- महाराष्ट्र मोटार वाहन (दहावी सुधारणा) नियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्र. एमव्हीआर-०१०४/प्र.क्र.४३/परि-२, दिनांक ३०.१०.२०१०

संदर्भः- आपली पत्रे १) क्र. १५७३६/म.वि.स./उपविधान/ड-११, दिनांक २८.०३.२०११
२) क्र. ३१४०८/म.वि.स./उपविधान/ड-११, दिनांक १०.०६.२०११

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**मुद्दा क्र.१ :-** टॅक्सी सेवेच्या कोणत्याही गटाशी संलग्न असलेल्या टॅक्सी तसेच रिक्षांना वेगवेगळ्या रंगाचा वापर केल्याचे दिसून येते. तद्संदर्भात अधिनियमातील तरतूदी काय आहेत.?

**अभिप्रायः-** मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ९६ च्या पोट-कलम (२) खंड (अठरा) नुसार राज्य शासनास परिवहन वाहनांची रंगसंगती ठरविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. प्रवासी वाहतूक करण्या-या परिवहन संवर्गातील वेगवेगळ्या वाहनांची रंगसंगतीबाबत खालीलप्रमाणे महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये नियम विहित करण्यांत आलेले आहेत.

| अ.क्र. | नियम | वाहन प्रकार | रंगसंगती |
|---|---|---|---|
| १ | नियम १३४ | --- | विशिष्ठ रितीने रंग देण्यास किंवा चिन्हीत करण्यास मनाई करण्यात आली आहे. |
| २ | नियम १३५ (१) | ऑटोरिक्षा / मोटार टॅक्सी | काळा-पिवळा |
| ३ | नियम १३५ (८) | मोटार कॅब (वातानुकूलीत) | मेटॅलिक सिल्व्हर आणि टप मोरपिशी निळा |
| ४ | राज्य परिवहन प्राधिकरण ठराव क्र. १६/२००६ | फ्लीट टॅक्सी योजनेनंतर्गत मोटार कॅब | राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या रंगसंगतीनुसार रंगसंगती |
| ५ | राज्य परिवहन प्राधिकरण ठराव क्र. ४/२०१० | कॉल टॅक्सी योजनेंतर्गत मोटार कॅब | राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या रंगसंगतीनुसार |

२१/६/२०११ [illegible]

D:SIAT

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ६६ अ नुसार ' फोन फ्लीट टॅक्सी सेवा' कार्यान्वीत करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर सेवा ही गट टॅक्सी सेवेत येत असल्याने लायसन्स धारक कंपनीकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर रंगसंगती मंजूर करण्याची बाब राज्य परिवहन प्राधिकरणासमोर ठेवून रंगसंगती निश्चित करता येईल.

ग्रामीण भागाकरीता परवाने देण्यात येणा-या ऑटोरिक्षांना शहरी भागात येऊन प्रवासी वाहतूक करु नये याकरिता ऑटोरिक्षांवर समोरच्या व मागच्या बाजूला " ग्रामीण भागाकरीता" असे लिहीण्यात येते. तथापि, त्या ऑटोरिक्षा ह्या काळ्या पिवळ्या रंगात रंगविलेल्या असतात.

मुद्दा क्र.२ :- बेस्टच्या बसेस व ए. सी. बसेसच्या रंगसंगती संदर्भात तद्संदर्भात अधिनियमातील तरतूदी काय आहेत.?

अभिप्राय:- महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १३४ (३) च्या परंतुकानुसार पालिका परिवहन सेवेतील टप्पा वाहने (बसेस) ही सिग्नल लाल रंगाने रंगविण्याची तरतूद आहे. त्यावर पोस्टाच्या लाल रंगाखेरिज इतर कोणत्याही रंगाचा एक पट्टा रंगविणे आवश्यक आहे. तसेच नियम १३५ (४) नुसार शहर बसेस आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शहर सेवेतील आणि ग्रामीण सेवेतील बसेस या दोन्हीही टप्पा वाहने ही राज्य प्राधिकरणाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या रंगाने रंगविण्यात येतात. (नियमांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.)

२. तरी, सदरची माहिती उप विधान समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात यावी व महाराष्ट्र मोटार वाहन (दहावी सुधारणा) नियम, २०१० प्रसिद्ध करणा-या प्रारुप अधिसूचना क्र. एमव्हीआर-०१०४ /प्र.क्र. ४३ परि-२, दिनांक ३०.१०.२०१० ला मान्यता देण्याबाबत विनंती करण्यात यावी.

आपला

( रा. गो. गायकवाड )
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत:- परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

D:\STA1c

## गृह (राज्य उत्पादन शुल्क ) विभाग

**अंतिम अधिसूचना क्रमांक - ४९ महाराष्ट्र शासन, अधिसूचना गृह विभाग क्रमांक एआरएम १०९६/२१/२/इएक्ससी ३, दिनांकित १३ सप्टेंबर, १९९६ मध्ये आवश्यक बदल करण्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक बीडब्ल्यूआर ११०६/सीआर-१६/मायक्रोब्रुव्हरी/ इएक्ससी-३, दिनांकित १० ऑगस्ट, २००९**

**उद्देश :**

उक्त अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

शासनाने दिनांक ०६ नाव्हेंबर,२००६ च्या आदेशाने मे ब्रुक्राफ्टस मायक्रो ब्रुईंग प्रा.लि.जि.पुणे या घटकास बीअर निर्मितीसाठी प्रकल्प उभारणीकरिता अटींच्या अधिन राहून इरादापत्र मंजूर करुन मायक्रो ब्रुव्हरीजच्या संकल्पनेस तत्वतः मान्यता दिली होती. मे ब्रुकाफ्टस मायक्रो ब्रुईंग प्रा.लि.जि.पुणे या घटकाची ब्रुवरी व ई-बार एकाच आवारात असून बीअरचे विक्रेत्यांमध्ये वितरण न होता थेट ग्राहकास बीअर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने प्रचलित नियमामध्ये आवश्यक तरतूद करण्यासाठी नियमात सुधारणा करणे गरजेचे होते. याबाबत अनुज्ञप्ती शुल्क आकारण्याची तरतूद करण्याचा प्रस्ताव आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर नियमात पुढीलप्रमाणे बदल करण्यात आले.

सुधारणा अधिसूचना गृह विभाग क्र. बीडब्ल्यू आर ११०६/ सीआर-१६/ मायक्रोब्रुवरी/ इएक्ससी-३ दि.१० ऑगस्ट,२००९.

शासन अधिसूचना, गृह विभाग क्रमांक एआरएम १०९६/२१/२/इएक्ससी-३ दि.१३ सप्टेंबर,१९९६ च्या अधिसूचनेच्या सोबत जोडलेल्या अनुसूचिमध्ये नोंद क्रमांक १-ब नंतर अंतर्भुत करावयाची नोंद :-

"१-क-मायक्रोब्रुव्हरीमधील बीअर रु.२० प्रति बल्क लिटर"

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाकडून प्राप्त झालेल्या विविध अधिसूचनांच्या अनुषंगाने समितीने दि. २ व ३ मार्च,२०१२ रोजी पुणे येथील मायको ब्रुव्हरीज प्रकल्प, कोरिंथिअन्स क्लब, कोंढवा, पुणे येथे भेट दिली व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांची साक्ष नोंदवली.

सदरहू साक्षीच्या दरम्यान समितीने " मे. ब्रुकाफ्टस् मायक्रो बुईंग प्रा. लि. पुणे, जि. पुणे या घटकाची ब्रुव्हरी व ई-बार एकाच आवारात असून बिअरचे विक्रेत्यांमध्ये वितरण न होता थेट ग्राहकास बिअर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने प्रचलित नियमामध्ये आवश्यक तरतूद करण्यासाठी ही अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. ग्राहकास थेट बिअर उपलब्ध करून देतेवेळी कंपनी बाटल्यांवर लेबल लावू शकते काय ? मायक्रोब्रुव्हरी मधील बिअरवर रु. २० प्रती बल्क लिटर इतके शुल्क आकारण्यात येत आहे. तसेच सिलबंद उत्पादनास सुरुवात करण्यामध्ये काय अडचणी आहेत, यासंदर्भातील आपली मते समितीला सांगा, " असे सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, " उत्पादकांची पाच लिटरच्या कॅनमध्ये बिअर पॅक करण्याची मागणी होती तशा प्रकारचा प्रस्तावही सादर झाला होता. त्याअनुषंगाने या बिअरच्या बॉटलिंग व लेबलिंगसाठी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यावर विधी व न्याय विभागाने नियमातील सध्याच्या तरतुदीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करून नवीन प्रपत्रे (फॉर्म्स) तयार करण्याबाबत सुचविले आहे. त्यानुसार यासंबंधातील कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करण्यात येईल."

यावर समितीने या कार्यवाहीमुळे शासनाचे उत्पन्न वाढले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली व अधिसूचनेसंदर्भात विचारविनिमय करून खालीलप्रमाणे शिफारस सुचविली.

**अभिप्राय व शिफारशी**

**" मे ब्रुक्राफ्टस् मायक्रो बुईंग प्रा.लि.पुणे,जि.पुणे या घटकाची ब्रुव्हरी व ई-बार एकाच आवारात असून बिअरचे विक्रेत्यांमध्ये वितरण न होता थेट ग्राहकास बिअर उपलब्ध करुन देण्यात येते. या बिअरच्या बॉटलिंग व लेबलिंगसाठी विधी व न्याय विभागाने सुचविल्याप्रमाणे, नियमातील सध्याच्या तरतुदी तसेच प्रपत्रे (फॉर्म्स) यामध्ये करावयाच्या सुधारणा याबाबतची संपूर्ण कार्यवाही एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी व त्यासंदर्भातील माहिती त्वरित समितीस कळविण्यात यावी. " अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

**गृह (राज्य उत्पादन शुल्क ) विभाग**

**अंतिम अधिसूचना क्रमांक - ५० महाराष्ट्र शासन अधिसूचना, गृह विभाग क्रमांक बीपीए.११२००९/२००९-१०/VIII, दिनांकित ३१ जानेवारी,२००९ मध्ये सुधारणा करण्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम अधिसूचना क्रमांक बीडब्ल्यूआर.११०६/ सीआर-१६ / मायक्रोब्रुव्हरी / इएक्ससी-३,दिनांकित १० ऑगस्ट, २००९**

**उद्देश :**

उक्त अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

" शासनाने दिनांक ०६ नोव्हेंबर,२००६ च्या आदेशाने मे. ब्रुकाफ्टस मायक्रो ब्रुईंग प्रा.लि.जि.पुणे या घटकास बीअर निर्मितीसाठी प्रकल्प उभारणीकरिता अटींच्या अधिन राहून इरादापत्र मंजूर करुन मायक्रो ब्रुव्हरीजच्या संकल्पनेस तत्वतः मान्यता दिली होती. मे. ब्रुकाफ्टस मायक्रो ब्रुईंग प्रा.लि.जि.पुणे या घटकाची ब्रुवरी व ई-बार एकाच आवारात असून बीअरचे विक्रेत्यांमध्ये वितरण न होता थेट ग्राहकास बीअर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने प्रचलित नियमामध्ये आवश्यक तरतूद करण्यासाठी नियमात सुधारणा करणे गरजेचे होते. याबाबत अनुज्ञप्ती शुल्क आकारण्याची तरतूद करण्याचा प्रस्ताव आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर नियमात पुढीलप्रमाणे बदल करण्यात आले.

त्यानुसार आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, मुंबई क्र.बीपीए ११२००९/२००९-१०/VIII दिनांकित ३१ जानेवारी,२००९ सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये स्तंभ-३ मध्ये खालील नोंद क्रमांक बी-१ मधील उपनोंद मध्ये

" अे " मध्ये खंड (डी) नंतर " (इ) वार्षिक
२,००,००० लिटर्स पर्यंत बिअरचे उत्पादन रु.२५,०००/-"
करणा-या मायक्रोब्रुव्हरीज करीता

ही नोंद अंतर्भूत करावी असा बदल करण्याबाबत शासन अधिसूचना बीडब्ल्यूआर ११०६/सीआर-१६ /मायक्रोब्रुव्हरी/इएक्ससी-३ , दिनांकित १० ऑगस्ट,२००९ निर्गमित करण्यात आली. "

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाकडून प्राप्त झालेल्या विविध अधिसूचनांच्या अनुषंगाने समितीने दि. २ व ३ मार्च,२०१२ रोजी पुणे येथील मायको ब्रुव्हरीज प्रकल्प, कोरिंथिअन्स क्लब, कोंढवा, पुणे येथे भेट दिली व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांची साक्ष नोंदवली.

सदरहू साक्षीच्या दरम्यान उक्त अधिसूचनेसंदर्भात समितीने बिअरमध्ये ९० टक्के पाणी वापरले जाते, पाणी स्वस्त मिळते. त्यामुळे २ लाख लिटर्सपर्यंत बिअरचे उत्पादन करणा-या मायक्रोब्रुव्हरीज करिता ५० पैसे दर लावण्यास काही हरकत नाही, याबाबत शासनाचे काय म्हणणे आहे, असे विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी ठिक आहे असे सांगितले त्या अनुषंगाने समितीने अधिसूचनेसंदर्भात विचारविनिमय करून खालीलप्रमाणे शिफारस सूचविली.

## अभिप्राय व शिफारशी

**" उक्त अधिसूचनेद्वारे वार्षिक २,००,००० लिटर्सपर्यंत बिअरचे उत्पादन करणा-या मायक्रोब्रुव्हरीकरिता रु.२५,०००/- इतके अनुज्ञप्ती शुल्क शासनाने निश्चित केले आहे. सदर शुल्क रु.२५,००० ऐवजी रु.१,००,०००/- इतके करण्यात यावे."**

## गृह (राज्य उत्पादन शुल्क ) विभाग

**अंतिम अधिसूचना क्रमांक ६ : शासन अधिसूचना, गृह विभाग क्रमांक एआरएम. १०९६/ २१/ २/ इएक्ससी-३ दिनांकित १३ सप्टेंबर, १९९६ मध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक एमआयएस.०२११/३३३/प्र.क्र.७६(१)/इएक्ससी-३, दिनांकित ३० मार्च, २०११**

**उद्देश :**

उक्त अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

देशी, विदेशी मद्य व बिअरवरील कर रचनेत २००९ मध्ये काही बदल करण्यात आले होते. त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला होता. मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांनी महाराष्ट्र शासनाचा सन २०११-१२ या वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना दिनांक २३ मार्च, २०११ रोजी झालेल्या भाषणातील भाग-२ मध्ये सदर प्रस्तावातील ठळक बाबींचा समावेश करण्यात आलेला होता. त्यासाठी महसूल वाढीतील उत्पादन शुल्कांतील रचनेत सुधारणा करावी लागणार आहे. मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ या कायद्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमामध्ये सदर सुधारणा अधिसूचना प्रसिध्द करण्यात येऊन सुधारीत करणे आवश्यक आहे. यामुळे शासन अधिसूचना दिनांक १३.९.१९९६ अधिक्रमीत करुन मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या नियम १०५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार दिनांक १ एप्रिल, २०११ पासून खालीलप्रमाणे सुधारणा केली आहे.

या अधिसुचनेमधील नोंद क्र. २,८,व १० ब यांचा समावेश मा. वित्त मंत्र्यांच्या भाषणात करण्यात आला होता. या सुधारणा करण्यात आल्यामुळे नोंद क्र. १,३,४,५,६,७ मध्ये अनुषंगिक सुधारणा करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे या नोंदीमध्ये सदर सुधारणा करण्यात आलेली आहे. नोंद क्र.९ व १० अ मध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नसून यापूर्वीच्या तरतुदींचे एकत्रिकरण करुन सुलभीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार उपरोक्त नियमात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली. यानुसार अनुसूची पुढीलप्रमाणे आहे.

## मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९

नोंद क्र.१

| नोंद क्र | विवरण | मुळ तरतूद | सुधारणा |
|---|---|---|---|
| (१) | अेल पॉर्टर, सायडर (अ) मद्यार्काची तीव्रता ८.७५ प्रुफ स्पिरिटपेक्षा जास्त नसल्यास | निर्मिती मूल्याच्या १०० टक्के किंवा रु.१६ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते | निर्मिती मूल्याच्या १५० टक्के किंवा रु.३३ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते |
| | (ब) मद्यार्काची तीव्रता ८.७५ प्रुफ स्पिरीटपेक्षा जास्त असल्यास | निर्मिती मूल्याच्या १०० टक्के किंवा रु. १८ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते | निर्मितीमूल्याच्या १७५ टक्के किंवा रु ४२ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते |

नोंद क्र. १ अ ऐवजी नोंद क्र. २ खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आली आहे

| | | | |
|---|---|---|---|
| (२) | २-बीअर (अ) मद्यार्काची तीव्रता ८.७५ प्रुफ स्पिरीटपेक्षा जास्त नसल्यास | निर्मिती मूल्याच्या १०० टक्के किंवा रु.१५ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते | निर्मिती मूल्याच्या १५० टक्के किंवा रु.३३ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते |
| | (ब) मद्यार्काची तीव्रता ८.७५ प्रुफ स्पिरीटपेक्षा जास्त असल्यास | निर्मिती मूल्याच्या १२५ टक्के किंवा रु. २० प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते | निर्मिती मूल्याच्या १७५ टक्के किंवा रु.४२ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते |

नोंद क्र. १ ब ऐवजी नोंद क्र. ३ खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आली आहे

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | अ) सौम्य मद्य-मद्यार्काची तीव्रता ८.७५ प्रुफ स्पिरीट (५% v/v) पेक्षा जास्त नसल्यास | निर्मिती मुल्याच्या १०० टक्के किंवा रु. प्र.ब.लि.यापैकी जे जास्त असेल ते | निर्मिती मूल्याच्या १५० टक्के किंवा रु.३३ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते |
| | ब) तीव्र मद्य-मद्यार्काची तीव्रता ८.७५ प्रुफ स्पिरीट (५% v/v) पेक्षा जास्त परंतु १४ प्रुफ स्पिरीटपेक्षा जास्त नसल्यास (8% v/v) | निर्मिती मुल्याच्या १२५ टक्के किंवा रु. २० प्र.ब.लि.यापैकी जे जास्त असेल ते | निर्मिती मूल्याच्या १७५ टक्के किंवा रु. ४२ प्रति बल्क लिटर यापैकी जे जास्त असेल ते |

नोंद क्र. १ क ऐवजी नोंद क्र. ४ खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आली आहे -

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | मायक्रोब्रुव्हरी मधील बीअर | रु. २० प्रती बल्क लिटर | रु.४२ प्रती बल्क लिटर |

नोंद क्र. २ ऐवजी नोंद क्र. ५ खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आली आहे -

| नोंद क्र विवरण | मुळ तरतूद | सुधारणा |
|---|---|---|
| ५) मद्यार्क युक्त सार | रु.५०/- मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रुफ लिटर | रु.७५/- मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रुफ लिटर |
| नोंद क्र.३ ऐवजी नोंद क्र.६ खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आली आहे. | | |
| ६) लिक्युअर्स, कार्डीअल्स, मिश्रणे आणि मद्यार्कयुक्त (औषधे व सोंदर्य प्रसाधने यांच्या व्यतिरिक्त) इतर पदार्थाकरीता | रु. १०० मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रती प्रुफ लिटर | रु. १५० मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रती प्रुफ लिटर |
| नोंद क्र.४ ऐवजी नोंद क्र.७ खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आली आहे - | | |
| ७) रेक्टीफाईड स्पिरीट | रु. १२५/- मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रती प्रुफ लिटर करीता | रु. २५०/- मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रती प्रुफ लिटर करीता |
| नोंद क्र.५ ऐवजी नोंद क्र.८ खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आली आहे - | | |
| ८) वरील नोंद क्रमांक ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारचे स्पिरीटस् (परंतु भारतात उत्पादन केलेले डिनेचर्ड स्पिरीट आणि महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ मध्ये व्याख्या केलेली देशी दारु सोडून) | निर्मिती मूल्याच्या २२५ टक्के अथवा रु. १८० मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रति प्रुफ लिटर करिता यापैकी जे जास्त असेल ते. | निर्मिती मूल्याच्या ३०० टक्के अथवा रु. २४० मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रति प्रुफ लिटर करीता, यापैकी जे जास्त असेल ते |

९) अनुसुची मध्ये नोंद क्र.६ ऐवजी नोंद क्र. ९ असा करण्यात आला आहे. परंतू यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

१०) अनुसूचीमध्ये नोंद क्र. ७ ऐवजी फक्त नोंद क्र. १० असा करण्यात आला आहे. परंतू यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

१० अ) यामधील उपनोंद क्र. ७ अ ऐवजी १० अ असा करण्यात आला आहे. परंतू यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

उपनोंद नोंद क्र. ७ ब ऐवजी क्र.१० ब खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात आली आहे :-

| | | |
|---|---|---|
| १० ब) काजूबोंडे, व मोहाफुले या व्यतिरिक्त इतर पदार्थापासून तयार केलेल्या मद्यार्कापासून उत्पादित केलेले | निर्मिती मूल्याच्या २२५ टक्के अथवा रु. ६५ मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रति प्रुफ लिटर करिता यापैकी जे जास्त असेल ते. | निर्मिती मूल्याच्या २५० टक्के अथवा रु. ९५ मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रति प्रुफ लिटर करिता यापैकी जे जास्त असेल ते. |

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाकडून प्राप्त झालेल्या विविध अधिसूचनांच्या अनुषंगाने समितीने दि. २ व ३ मार्च,२०१२ रोजी पुणे येथील मायक्रो ब्र्व्हरीज प्रकल्प, कोरिंथिअन्स क्लब, कोंढवा, पुणे येथे भेट दिली व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांची साक्ष नोंदवली.

१) सदरहू साक्षीच्या दरम्यान समितीने " निर्मितीमूल्य कसे ठरविले जाते? आपला विभाग ते कसे प्रमाणित करते ? उदा. चिवास रिगल या आयात मद्य उत्पादनाचे कंपनीने किती निर्मितीमूल्य जाहीर केले आहे? त्यावर आयात किती लावला जातो आणि किती उत्पादन शुल्क लावले जाते. हे उत्पादन विवरणपत्रातील कोणत्या गटात मोडेल यांची माहिती समितीला द्यावी " असे सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, " या विवरणपत्रातील अ. क्र. ८ मध्ये हे उत्पादन मोडेल. कारण अ.क्र. ८ मध्ये असे नमूद केलेले आहे की, " वरील नोंद क्रमांक ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारचे स्पिरीटस् ( परंतु भारतात उत्पादन केलेले डिनेचर्ड स्पिरीट आणि महाराष्ट्र देशी दारु नियम १९७३ मध्ये व्याख्या कलेली देशी दारु सोडून) " त्यानुसार " निर्मितीमूल्याच्या ३०० टक्के अथवा रु. २४० मद्यार्काची भरवणी असलेल्या प्रति प्रुफ लिटर करीता, यापैकी जे जास्त असेल ते " याप्रमाणे उत्पादन शुल्क वसूल करण्यात येईल " सीलबंद बाटलीवर एक किंवा दोन हजार रुपये किंमत असेल तर त्यावर २० टक्केच्यावर मॅन्युफॅक्चरींग किंमत असते उत्पादन शुल्क जर मॅन्युफॅक्चरींग कॉस्टच्या ३०० टक्के असेल तर त्यावर १२०० रुपये कर शासनाला वसूल करता येतो. कस्टम ड्युटी ॲड करुन सीलबंद बाटलीवर किंमत छापण्यात येत असते, " यावर समितीने कस्टम ड्युटी गृहीत धरुन किंमत धरली जाते, आयात निर्यात कर आपल्याकडे आहे, शासनाचा महसूल वाढेल अशी अधिनियमात तरतुद करण्यात यावी, कर कोणत्या रकमेवर आकारावा व कसा आणि किती आकारावा यासंदर्भातील स्पष्ट सूचना देण्याचे तसेच कर ठरविण्याचे अधिकार शासनाला आहेत, असे सुचवून उक्त अधिसूचनेस त्याप्रमाणे शिफारस केली.

२) तसेच, समितीने मायक्रो ब्र्व्हरीज प्रकल्प, कोरिंथिअन्स क्लब, कोंढवा, पुणे येथे भेट दिली त्यावेळी कंपनीच्या संचालकांनी सांगितले की, कंपनीतर्फे तयार करण्यात येणा-या बिअरमध्ये मद्यार्कांची तीव्रता ५ ते ५.८ टक्के प्रुफ स्पिरीट पेक्षा जास्त नसते. त्यामुळे समितीने या अधिसूचनेतील अनुक्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे

| | |
|---|---|
| बिअर<br>(अ) मद्यार्कांची तीव्रता ८.७५ प्रुफ स्पिरीट पेक्षा जास्त नसल्यास (५% V/V) | निर्मिती मूल्याच्या १५० टक्के किंवा रुपये ३३ प्रति बल्क लिटर, यापैकी जे जास्त असेल ते. |

ही तरतूद विचारता घेता मायक्रोब्र्व्हरी मधील बिअरमध्ये मद्यार्कांची तीव्रता ८.५ टक्के प्रुफ स्पिरीट पेक्षा कमी असल्याने समितीने त्याप्रमाणे शिफारस केली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

**(१) जेथे निर्मिती मूल्यावर आधारित उत्पादन शुल्क आकारण्यात येते, तेथे आयात कर धरुन जो खर्च त्या उत्पादनासाठी उत्पादकास करावा लागतो, तो सर्व खर्च निर्मितीमूल्यामध्ये अंतर्भूत करुन म्हणजेच आयात करासह निर्मितीमूल्य धरुन त्यावर उत्पादन शुल्क निश्चित करण्याबाबतची बाब विभागाने तपासून पहावी व त्यासंदर्भातील अभिप्राय समितीस कळविण्यात यावेत.**

**(२) या अधिसूचनेच्या अनुसूचीतील अ.क्र.४ मध्ये " मायक्रो ब्र्व्हरीनिर्मित बीअर " साठी " रु.४२ प्रति बल्क लिटर " ऐवजी " मायक्रो ब्र्व्हरीनिर्मित बीअर " साठी " रु.३३ प्रति बल्क लिटर " अशी सुधारणा करण्यात यावी, अशी शिफारस समितीने शासनास केली आहे.**

# परिशिष्ट एक

# परिशिष्ट - एक

## अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यास तसेच उपविधान समितीस माहिती पाठविण्यास विभागास झालेला विलंब दर्शविणारे विवरणपत्र.

| अ.क्र | अंतिम अधिसूचनेचा क्रमांक | विभागाचे नाव | अधिसूचनेचा विषय | अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द केल्याचा दिनांक | विभागाकडून अधिसूचनेच्या ७५ प्रती व स्पष्टीकरणात्मक टिप्पणी पाठविण्याचा दिनांक | विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर अधिसूचना ठेवण्यासाठी पाठविण्यास झालेला विलंब वर्षे, महिने, दिवस | समितीसमोर विचारार्थ ठेवण्यासाठी अधिसूचना पाठविण्यास विभागाकडून झालेला विलंब |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| (१) | १ | **महिला व बाल विकास विभाग.** | महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित नियम, २०११ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक जेजेए.२००७/प्र.क्र.१००/ का.३, दिनांकित ११ जानेवारी, २०११. | ११ जानेवारी, २०११. | २४ फेब्रुवारी, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - ३० | ३० दिवस |
| (२) | २ | **नगरविकास विभाग** | मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महानगरपालिकेची निवडणूक घेणे) (अनुसूची 'घ' ची सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी.२००८/ ४८१/ प्र. क्र. १९ / नवि-३२(१), दिनांकित ६ नोव्हेंबर, २०१० | ६ नोव्हेंबर, २०१०. | २५ फेब्रुवारी, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ३ ६ | ९६ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (३) | ३ | नगरविकास विभाग | नागपूर शहर पालिका निवडणूक (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००८ / ४८१/ प्र.क्र.१९/ नवि-३२(२), दिनांकित ६ नोव्हेंबर, २०१०. | ६ नोव्हेंबर, २०१०. | २५ फेब्रुवारी, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ३ ६ | ९६ दिवस |
| (४) | ४ | नगरविकास विभाग | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणूक (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००८/ ४८१/ प्र.क्र. १९/नवि-३२ (३), दिनांकित ६ नोव्हेंबर, २०१०. | ६ नोव्हेंबर, २०१०. | २५ फेब्रुवारी, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ३ ६ | ९६ दिवस |
| (५) | ५ | वित्त विभाग | महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) निबम, २०११ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक तेविआ. १०१०/ प्र.क्र.७४/ २०१०/वित्त आयोग कक्ष, दिनांकित ११ मार्च, २०११. | ११ मार्च, २०१०. | १७ मार्च, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - - | - दिवस |
| (६) | ६ | गृह विभाग | मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १०५ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक एमआयएस ०२११/ ३३३/ प्र.क्र.७६(१)/इएक्ससी-३, दिनांकित ३० मार्च, २०११. | ३० मार्च, २०१०. | १ एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - - | - दिवस |

## परिशिष्ट - एक—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (७) | ७ | गृह विभाग | मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १३९ च्या उप-कलम (१) च्या खंड (ड१) अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आदेश क्रमांक एमआयएस ०२११/३३३/प्र.क्र.७६(२)/इएक्ससी-३, दिनांकित ३० मार्च, २०११. | ३० मार्च, २०१०. | १ एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - - | - दिवस |
| (८) | ८ | गृह विभाग | महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्धारण) (सुधारणा)हि नियम, २०११ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमआयएस ०२११/३३३/ प्र.क्र.७६(३)/इएक्ससी-३, दिनांकित ३० मार्च, २०११. | ३० मार्च, २०१०. | १ एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - - | - दिवस |
| (९) | ९ | गृह विभाग | मुंबई विदेशी मद्य आणि शुध्द मद्यार्क (वाहतूक शुल्क) (सुधारणा) नियम २०११ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमआयएस ०२११/३३३/ प्र.क्र.७६(४)/ इएक्ससी-३, दिनांकित ३० मार्च, २०११. | ३० मार्च, २०१०. | १ एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - - | - दिवस |
| (१०) | १० | गृह विभाग | महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ०८०८/प्र.क्र. १५३/ परि-२, दिनांकित २२ मार्च, २०११. | २२ मार्च, २०१०. | १ एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - ३ | ३ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (११) | ११ | वित्त विभाग | महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मुवक १५११/ प्र.क्र. ४४/ कराधान-१ दिनांकित १७ मार्च, २०११. | १७ मार्च, २०१०. | १५ एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - १५ | १५ दिवस |
| (१२) | १२ | वित्त विभाग | महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (दुसरी सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मुवक १५११/प्र.क्र. ४५/कराधान- १, दिनांकित १७ मार्च, २०११ व शुध्दीपत्र क्रमांक मुवक १५११/ प्र.क्र.४५/कराधान-१, दिनांकित २५ मार्च, २०११. | १७ मार्च, २०१०. | १५ एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - १५ | १५ दिवस |
| (१३) | १३ | सामान्य प्रशासन विभाग. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम अधिसूचना क्रमांक केंमाअ २०१०/प्र.क्र.३३१/ १०/ सहा, दिनांकित ७ मार्च २०११. | ७ मार्च, २०११. | १८ एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - २८ | २८ दिवस |
| (१४) | १४ | नगर विकास विभाग | मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/९४/ ·प्र.क्र.५९/ नवि-३२ (१) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १५ ऑक्टोबर, २०१०. | ३० एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ६ १ | १८१ दिवस |

# परिशिष्ट - एक—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१५) | १५ | नगर विकास विभाग | मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र. ५९/ नवि-३२(२), दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १५ ऑक्टोबर, २०१०. | ३० एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ६ १ | १८१ दिवस |
| (१६) | १६ | नगर विकास विभाग | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) (दुसरी सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/९४/ प्र.क्र.५९/नवि-३२ (७) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १५ ऑक्टोबर, २०१०. | ३० एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ६ १ | १८१ दिवस |
| (१७) | १७ | नगर विकास विभाग | महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/नवि-३२ (८) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १५ ऑक्टोबर, २०१०. | ३० एप्रिल, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ६ १ | १८१ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१८) | १८ | नगर विकास विभाग | नागपूर शहर महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी २००९ / ९४/ प्र. क्र. ५९/नवि-३२ (३), दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १५ ऑक्टोबर, २०१०. | ९ मे, २०११. | वर्षे, महिने, दिवस - ६ १० | १९० दिवस |
| (१९) | १९ | नगर विकास विभाग | मुंबई महानगरपालिका (स्थायी समिती, सुधारणा समिती, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती, शिक्षण समिती, प्रभाग समित्या आणि इतर विशेष समित्या यांच्या सभापती पदांसाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/नवि-३२(४) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १५ ऑक्टोबर, २०१०. | ९ मे, २०११. | वर्षे, महिने, दिवस - ६ १० | १९० दिवस |
| (२०) | २० | नगर विकास विभाग | मुंबई प्रांतिक महानगर पालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/ ९४/ प्र.क्र.५९/ नवि-३२ (५) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १५ ऑक्टोबर, २०१०. | ९ मे, २०११. | वर्षे, महिने, दिवस - ६ १० | १९० दिवस |

## परिशिष्ट - एक—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (२१) | **२१** | **नगर विकास विभाग** | नागपूर शहर महानगरपालिका (स्थायी समिती, प्रभाग समित्या, विशेष समंत्रक समित्या यांच्या सभापतींची निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१० प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी. २००९/९४/ प्र.क्र.५९/ नवि-३२ (६) दिनांकित १५ ऑक्टोबर, २०१०. | १५ ऑक्टोबर, २०१०. | ९ मे, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ६ १० | १९० दिवस |
| (२२) | **२२** | **गृह विभाग** | मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १०५ खालील अधिसूचना क्र. एमआयएस ०२११/ ३३३/ प्र.क्र. ७६(१) / इएक्ससी-३, दिनांकित ३० मार्च, २०११ च्या अंतिम अधिसूचने संदर्भात काढलेले शुध्दीपत्र व क्र.एमआयएस ०२११/ ३३३/ प्र.क्र. ७६ (१)/ इएक्ससी-३, दिनांकित २४ मे, २०११. | २४ मे, २०११. | २७ जून, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - २० | २० दिवस |
| (२३) | **२३** | **गृह विभाग** | महाराष्ट्र बिअर आणि वाईन निर्मिती (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमआयएस ११०९/सीआर २७३/ इएक्ससी ३, दिनांकित २४ मे, २०११. | २४ मे, २०११. | ३० जून, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - २२ | २२ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (२४) | २४ | **वित्त विभाग** | महाराष्ट्र ऊस खरेदीकर (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक उखक १०११/ प्र.क्र. ९५/कराधान - ३, दिनांकित ३० एप्रिल, २०११. | ३० एप्रिल, २०१०. | २ जुलै, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- १ १८ | ४८ दिवस |
| (२५) | २५ | **सामान्य प्रशासन विभाग** | महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ अंतर्गत प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक एलपीएल १२११/प्र.क्र.८/ ११/ १५, दिनांकित १० मार्च, २०११. | १० मार्च, २०११. | १२ जुलै, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ३ १९ | १०९ दिवस |
| (२६) | २६ | **गृह (परिवहन) विभाग** | महाराष्ट्र मोटार वाहन (पहिली सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. एमव्हीआर ०८०७/ प्र.क्र. ११० / परि-२, दिनांकित १० मार्च, २०११. | १० मार्च, २०११. | १६ जुलै, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ३ २३ | ११३ दिवस |
| (२७) | २७ | **वित्त विभाग** | महाराष्ट्र राजकोषीय उत्तरादायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (दुसरी सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक तेविआ/१०११/प्र.क्र.१४/ २०११/वित्त आयोग कक्ष, दिनांकित १८ जुलै, २०११. | १८ जुलै, २०११. | ४ ऑगस्ट, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - २ | २ दिवस |

## परिशिष्ट - एक—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (२८) | **२८** | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. जिपनि-२०११/प्र.क्र.७१/पंरा-२, दिनांकित ३ जून, २०११. | ३ जून, २०११. | ६ ऑगस्ट, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- १ १९ | ४९ दिवस |
| (२९) | **२९** | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उप सरपंच) निवडणूक (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक ग्रापंनि. २०११/प्र.क्र. ६४ / पंरा-२, दिनांकित ८ जून, २०११. | ८ जून, २०११. | ६ ऑगस्ट, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- १ १४ | ४४ दिवस |
| (३०) | **३०** | **नगरविकास विभाग** | मुंबई प्रांतिक महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चकानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी.२०११ / १९७ / सीआर-७७/नवि-३२(१), दिनांकित ५ जुलै, २०११. | ५ जुलै, २०११. | ८ ऑगस्ट, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - १९ | १९ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (३१) | ३१ | **नगरविकास विभाग** | महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. एमएमसी-२०११/ १९७/ सीआर-७७, नवि.३२(३), दिनांकित ५ जुलै, २०११. | ५ जुलै, २०११. | ८ ऑगस्ट, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - १९ | १९ दिवस |
| (३२) | ३२ | **वित्त विभाग** | महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ मधील अनुसूची ग आणि घ मध्ये सुधारणा करणारी अंतिम अधिसूचना क्र. मुवक १५११/प्र.क्र.८६/ कराधान-१, दिनांकित ६ जुलै, २०११. | ६ जुलै, २०११. | ९ सप्टेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - ५० | ५० दिवस |
| (३३) | ३३ | **वित्त विभाग** | केंद्रिय विक्रीकर (मुंबई) (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. केविअ-१५१०/प्र.क्र.१६१/ कराधान-१, दिनांकित २६ एप्रिल, २०११. | २६ एप्रिल, २०११. | ९ सप्टेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ४ १ | १२१ दिवस |
| (३४) | ३४ | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. सेप्रनि-२०११/सं.क्र.२६०/आस्था-१०, दिनांकित २५ ऑगस्ट, २०११. | २५ ऑगस्ट, २०११. | ३० सप्टेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - २१ | २१ दिवस |
| (३५) | ३५ | **वित्त विभाग** | महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (चौथी सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. मुवक १५११ / प्र.क्र.८४ /कराधान-१, दिनांकित १३ सप्टेंबर, २०११. | १३ सप्टेंबर, २०११. | २५ ऑक्टोबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - २७ | २७ दिवस |

## परिशिष्ट - एक—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (३६) | **३६** | **अन्न, नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग** | महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. वैमायं. २०१०/ ८१६/ प्र.क्र. १७५/ग्रा.सं.४, दिनांकित २८ एप्रिल, २०११. | २८ एप्रिल, २०११. | १८ नोव्हेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ६ ९ | १८९ दिवस |
| (३७) | **३७** | **शालेय शिक्षण व क्रिडा विभाग** | महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र.पीआरई-२०१०/ प्र.क्र. २१२ (बी) / पीई-१, दिनांकित ११ ऑक्टोबर, २०११. | ११ ऑक्टोबर, २०११. | २१ नोव्हेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - २६ | २६ दिवस |
| (३८) | **३८** | **सामान्य प्रशासन विभाग** | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये महाराष्ट्र शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीआरटीआय/ २००५/ प्र. क्र. २६५/ ०५/५, दिनांकित ११ ऑक्टोबर, २००६ मध्ये करण्यात आलेली सुधारणा प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र.माअअ-२०११/९/प्र.क्र. १२२/ २०११ / सहा, दिनांकित २३ ऑगस्ट, २०११. | २३ ऑगस्ट, २०११. | २९ नोव्हेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- २ २३ | ८३ दिवस |
| (३९) | **३९** | **नगरविकास विभाग** | मुंबई प्रांतिक महानगरपालिका (इमारतीचे परिनिरीक्षण) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. एमएमसी. २०१०/ प्र. क्र.५/नवि-३२ (१), दिनांकित ८ जुलै, २०११. | ८ जुलै, २०११. | ७ डिसेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ४ १७ | १३७ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (४०) | ४० | **नगरविकास विभाग** | महाराष्ट्र नगरपरिषदा (इमारतीचे परिनिरीक्षण) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. एमएमसी. २०१०/प्र.क्र.५/नवि-३२ (३), दिनांकित ८ जुलै, २०११. | ८ जुलै, २०११. | ७ डिसेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ४ १७ | १३७ दिवस |
| (४१) | ४१ | **गृह विभाग** | मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. बीपीए. ०२११/प्र.क्र.४३/राउशु-२, दिनांकित १६ नोव्हेंबर, २०११. | १६ नोव्हेंबर, २०११. | १२ डिसेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - ११ | ११ दिवस |
| (४२) | ४२ | **नगरविकास विभाग** | महाराष्ट्र महानगर- पालिका (महापौर पदांचे आरक्षण) (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. एमएमसी. २०११ / ८० / प्र.क्र.३६ /नवि- ३२(१), दिनांकित ७ जून, २०११. | ७ जून, २०११. | १५ डिसेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ५ २६ | १७६ दिवस |
| (४३) | ४३ | **नगरविकास विभाग** | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. एमएमसी. २०११ / ८० / प्र.क्र.३६/ नवि-३२ (२), दिनांकित ७ जून, २०११. | ७ जून, २०११. | १५ डिसेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- ५ २६ | १७६ दिवस |
| (४४) | ४४ | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. व्हीपीएम. २६०९/प्र.क्र.१०६/पंरा-४ (२२), दिनांकित २१ नोव्हेंबर, २०११. | २१ नोव्हेंबर, २०११. | २० डिसेंबर, २०११. | वर्षे, महिने, दिवस<br>- - १४ | १४ दिवस |

## परिशिष्ट - एक—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (४५) | ४५ | वित्त विभाग | महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (पाचवी सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. मुवक १५११/ प्र. क्र. १३९/कराधान-१, दिनांकित २५ ऑक्टोबर, २०११. | २५ ऑक्टोबर, २०११. | १६ जानेवारी, २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>- २ ८ | ६८ दिवस |
| (४६) | ४६ | गृह विभाग | महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, विक्रीच्या नोंद वह्या इत्यादी) (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. बीपीए. ०३११/प्र.क्र. ७५/१/राउशु-२, दिनांकित ८ नोव्हेंबर, २०११. | ८ नोव्हेंबर, २०११. | २४ जानेवारी, २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>- २ २ | ६२ दिवस |
| (४७) | ४७ | गृह विभाग | महाराष्ट्र देशी दारु (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. बीपीए. ०३११/प्र.क्र.७५/ २/राउशु- २, दिनांकित ८ नोव्हेंबर, २०११. | ८ नोव्हेंबर, २०११. | २४ जानेवारी, २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>- २ २ | ६२ दिवस |
| (४८) | ४८ | गृह विभाग | विशेष परवाने व अनुज्ञप्ती (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. बीपीए. ०३११/प्र.क्र.७५/ ३/राउशु-२, दिनांकित ८ नोव्हेंबर, २०११. | ८ नोव्हेंबर, २०११. | २४ जानेवारी, २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>- २ २ | ६२ दिवस |
| (४९) | ४९ | गृह विभाग | ताडी दुकाने (अनुज्ञप्ती) आणि ताडी झाडे (छेदणे) (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. बीपीए. ०३११/प्र.क्र.७५/४/राउशु- २, दिनांकित ८ नोव्हेंबर, २०११. | ८ नोव्हेंबर, २०११. | २४ जानेवारी, २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>- २ २ | ६२ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (५०) | ५० | **वित्त विभाग** | महाराष्ट्र ऊस खरेदीकर नियम, १९६२ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक ऊखक.१०११/प्र. क्र. १००/ कराधान-३, दिनांकित ३० एप्रिल, २०११. | ३० एप्रिल, २०११. | ७ फेब्रुवारी, २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>- ८ २८ | २६८ दिवस |
| (५१) | ५१ | **गृह विभाग (विशेष)** | महाराष्ट्र खाजगी सुरक्षा अभिकरणे (विनियमन) नियम, २००७ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. पीएसए. १००६/प्र.क्र.५०१/दिशा-४, दिनांकित १४ मार्च, २००७. | १४ मार्च, २००७. | ८ फेब्रुवारी, २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>४ १० १६ | १७७६ दिवस |
| (५२) | ५२ | **वित्त विभाग** | महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सहावी सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र. मुवक १५११/प्र.क्र.१३८/ कराधान-१, दिनांकित ५ डिसेंबर, २०११. | ५ डिसेंबर, २०११. | १७ फेब्रुवारी, २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>- १ २९ | ५९ दिवस |
| (५३) | ५३ | **गृह विभाग (विशेष)** | महाराष्ट्र खाजगी सुरक्षा अभिकरणे (विनियमन) (सुधारणा) नियम, २००८ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्र.पीएसए.१००६/प्र.क्र. ५०१ (भाग दोन) /विशेष-४ दिनांकित २४ जुलै, २००८. | २४ जुलै, २००८. | ३ मार्च. २०१२. | वर्षे, महिने, दिवस<br>३ ६ २८ | १३०३ दिवस |
